cmyk

दैनिक

www.epaper.rajyaloktantra.com

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

● छत्रपती संभाजीनगर ● पुणे ● अहिल्यानगर ● जालना ● धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड - महाराष्ट्र | वर्ष-६ | अंक-१३५ | मंगळवार दि.०४ ऑगस्ट २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/858 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने-६ | किंमत ३ रूपये


## थोडक्यात...

### पादचाऱ्यांसाठी स्वतंत्र जागा असावी - सर्वोच्च न्यायालय

दिल्ली: देशातील प्रत्येक रस्त्यावर पादचाऱ्यांसाठी चालण्यास योग्य, स्पष्टपणे चिन्हांकित आणि अतिक्रमाण नसलेली अशी स्वतंत्र जागा उपलब्ध करून देण्याचे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने सोमवारी केंद्र सरकारला दिले आहेत. न्यायाधीश पी. एस. नरसिंहा आणि न्यायाधीश आलोक अराधे यांच्या खंडपीठाने केंद्र सरकारतर्फे उपस्थित असलेले अतिरिक्त सॉलिसिटर जनरल के. एम. नटराज यांना यासंदर्भात सर्व संबंधित प्राधिकरणांना तातडीने सूचना देण्याचे आदेश दिले. मोठी गुंतवणूक किंवा बांधकाम न करताही, केवळ दोरी किंवा इतर कोणत्याही माध्यमातून पादचाऱ्यांची जागा स्पष्टपणे चिन्हांकित करा. जिथे जिथे रस्ता आहे, तिथे चालणाऱ्यांसाठी जागा असावी आणि त्यावर कोणतेही अतिक्रमण होणार नाही याची खात्री करा असे निर्देश न्यायालयाने दिले. वाहनांच्या भीतीशिवाय आपण सुरक्षितपणे चालू शकतो, असा विश्वास पादचाऱ्यांमध्ये निर्माण झाला पाहिजे, यावर न्यायालयाने भर दिला.

### लैंगिक छळप्रकरणी बृजभूषण शरण सिंह निर्दोष

दिल्ली:दिल्ली न्यायालयाने सोमवारी भारतीय जनता पक्षाचे (भाजप) माजी खासदार बृज भूषण शरण सिंह यांची महिला कुस्तीपटूंच्या लैंगिक छळाशी संबंधित प्रकरणात निर्दोष मुक्तता केली. राऊस ॲव्हेन्यू न्यायालयाच्या अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी (एसीजेएम) अश्विनी पनवार यांनी हा आदेश दिला. या प्रकरणात सहआरोपी विनोद तोमर यांचीही निर्दोष मुक्तता करण्यात आली. बृजभूषण शरण सिंह यांच्या वकिलांनी ही ''सन्माननीय निर्दोष मुक्तता'' असल्याचे म्हटले. हे प्रकरण सहा महिला कुस्तीपटूंनी बृजभूषण शरण सिंह यांच्यावर केलेल्या लैंगिक छळाच्या आरोपांशी संबंधित आहे. त्यांच्या तक्रारींच्या आधारे, पोलिसांनी खासदाराविरुद्ध एफआयआर नोंदवला होता. १५ जून २०२३ रोजी, पोलिसांनी आरोपपत्र दाखल केले. १० मे २०२४ रोजी, सत्र न्यायालयाने पाच महिला कुस्तीपटूंचा छळ केल्याबद्दल बृजभूषण शरण सिंह यांच्यावर लैंगिक छळ आणि महिलांचा विनयभंग केल्याचा आरोप निश्चित केला होता.

### कर्नाटकमध्ये काँग्रेसच्या दोन आमदारांचा राजीनामा

बंगळुरू: कर्नाटकातील काँग्रेस सरकारमध्ये मंत्रिमंडळ विस्तारापूर्वीच मोठे राजकीय नाट्य घडले आहे. मंत्रिपद न मिळाल्याने काँग्रेसचे दोन आमदार नाराज झाले असून त्यांनी आपल्या आमदारकीचा तडकाफडकी राजीनामा दिला आहे. या घडामोडीमुळे राज्याच्या राजकारणात एकच खळबळ उडाली आहे. राजीनामा देणाऱ्या आमदारांमध्ये विजयपूरा जिल्ह्यातील इंडी मतदारसंघाचे आमदार यशवंत रायगौडा व्ही. पाटील आणि सागर मतदारसंघाचे आमदार बेलूर गोपालकृष्णा यांचा समावेश आहे. मंत्रिमंडळात संधी न मिळाल्यामुळे त्यांनी हा निर्णय घेतल्याचे सांगितले जात आहे. दरम्यान, मुख्यमंत्री डी. के. शिवकुमार यांच्या नेतृत्वाखाली सोमवारी मंत्रिमंडळाचा विस्तार करण्यात आला. या विस्तारात २० नव्या मंत्र्यांचा शपथविधी होणार असून नव्या आणि अनुभवी चेहऱ्यांना संधी देण्यात आली आहे.

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती,

बीड, दि.०३ ऑगस्ट २०२६

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: २०५.५० क्विंटल | २,५७८ | २,७४२ | २,६४७ |
| ज्वारी/हायब्रिड :१७५.५० क्विंटल | २,५०० | ३,९०० | ३,१०९ |
| मका/लोकल: १५.०० क्विंटल | २,४५० | २,४५० | २,४५० |
| तूर : १९.०० क्विंटल | ३,९०० | ७,४०० | ५,८६६ |
| उडीद : २.०० क्विंटल | ५,००० | ५,००० | ५,००० |
| बाजरी: ६६.५० क्विंटल | २,४०० | २,८९९ | २,६७३ |
| मुग: ४१.५० क्विंटल | ५,८०० | ५,८१२ | ५,८०६ |
| सोयाबीन: ६.०० क्विंटल | ७,००० | ७,००० | ७,००० |
| हरभरा: १८.०० क्विंटल | ५,८२२ | ५,८७२ | ५,८४७ |

# आज शेतकऱ्यांच्या कर्ज खात्यात ७ हजार कोटी जमा होणार?

## ९४ हजार प्राप्तिकरदाते शेतकरी अपात्र

मुंबई । प्रतिनिधी

**राज्य सरकारच्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना-२०२६ अंतर्गत शेतकऱ्यांसाठी मोठी दिलासादायक घडामोड समोर आली आहे. सहकार विभागाच्या माहितीनुसार, मंगळवारी (४ ऑगस्ट) राज्यातील १६ लाख ९६ हजार पात्र शेतकऱ्यांच्या पीक कर्ज खात्यात एकाचवेळी सुमारे ७ हजार कोटी रुपये जमा करण्यात येणार आहेत. त्यामुळे संबंधित शेतकऱ्यांचे थकीत पीक कर्ज निकाली निघून त्यांना पुन्हा नव्याने पीक कर्ज घेण्याचा मार्ग मोकळा होणार आहे. दरम्यान, योजनेच्या पडताळणी प्रक्रियेत ९४ हजार प्राप्तिकर भरणारे शेतकरी अपात्र ठरल्याची माहिती समोर आली आहे.**

सरकारने दोन लाख रुपयांपर्यंत थकीत पीक कर्ज असलेल्या शेतकऱ्यांची यादी प्राप्तिकर विभागाकडे पडताळणीसाठी पाठविली होती. या छाननीत प्राप्तिकरदाते शेतकरी आढळून आल्याने त्यांना कर्जमाफी योजनेतून वगळण्यात आले आहे. राज्य सरकारने या योजनेअंतर्गत ३० सप्टेंबर २०२५ पर्यंत थकीत असलेल्या पीक कर्जाला दोन लाख रुपयांच्या मर्यादेत कर्जमाफी देण्याची घोषणा केली आहे.



तसेच, नियमित पीक कर्जाची परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांचे प्रोत्साहन अनुदान देण्याचाही निर्णय घेतला आहे. याशिवाय, दोन लाख रुपयांपेक्षा जास्त थकीत कर्ज असलेल्या शेतकऱ्यांसाठीही एकवेळ समझोता योजना लागू करण्यात आली आहे. या अंतर्गत शेतकऱ्यांनी दोन लाखांवरील स्वतःचा वाटा बँकेत भरल्यानंतर सरकार त्यांच्या कर्ज खात्यात दोन लाख रुपये जमा करणार आहे. सहकार विभागाच्या सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, पात्र ठरलेल्या १६.९६ लाख शेतकऱ्यांनी आधार प्रमाणीकरण पूर्ण केल्यानंतरच त्यांच्या कर्ज खात्यात रक्कम जमा होईल. त्यामुळे ज्या शेतकऱ्यांचे आधार प्रमाणीकरण अद्याप झालेले नाही, त्यांनी ते तातडीने पूर्ण करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. राज्य सरकारच्या या

▶▶ पान २ वर

# पंतप्रधानांचा व्हिडिओ हटविल्याप्रकरणी मेटाकडून माफी मागण्याची तयारी

दिल्ली । वृत्तसंस्था

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा व्हिडिओ फेसबुकवरून तात्पुरता हटवल्याबद्दल भाजप सदस्यांनी प्रश्न उपस्थित केल्यानंतर, इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान विषयक संसदीय स्थायी समितीच्या बैठकीत मेटाचे अधिकारी चौकशीच्या फेऱ्यात आले आहेत.

सूत्रांनुसार, एका वरिष्ठ भाजप खासदाराने मेटाच्या प्रतिनिधींना विचारले की, पंतप्रधानांचा व्हिडिओ का हटवण्यात आला. या निर्णयाला कोणी अधिकृत केले आणि इतर आक्षेपार्ह सामग्री ऑनलाइन राहू देत असताना या प्लॅटफॉर्मने त्यावर कारवाई का केली. या व्हिडिओला हटवण्यासाठी अंतिम जबाबदारी कोणाची होती आणि मेटाने यात सामील असलेल्या व्यक्तींची ओळख पटवली आहे का, हे जाणून घेण्याचाही खासदाराने प्रयत्न केला.




सूत्रांनी सांगितले की, मेटा कंपनीच्या प्रतिनिधींनी या घटनेबद्दल खेद व्यक्त केला आणि माफी मागण्याची तयारी दर्शवली. मात्र, एका भाजप सदस्याने त्यांना सांगितले की केवळ माफी मागणे पुरेसे नाही. समिती जबाबदारीची मागणी करत आहे. सूत्रांनुसार, खासदार म्हणाले, ''या निर्णयासाठी जबाबदार असलेल्यांना ओळखले पाहिजे आणि त्यानंतर योग्य कायदेशीर कारवाई केली पाहिजे.'' संसदीय समिती कंटेंट मॉडरेशन

▶▶ पान २ वर

# पंकजा मुंडे निवृत्त झाल्या तर धनंजय मुंडे सर्वत्र धिंगाणा घालतील

## जरांगे पाटलांचा पुन्हा धनंजय मुंडेंवर घणाघात

बीड । प्रतिनिधी

भाजप नेत्या तथा मंत्री पंकजा मुंडे यांनी एका कार्यक्रमात राजकारणातून रिटायर्ड व्हावे असे वाटत असल्याचे म्हटले. पण कार्यकर्त्यांचा उत्साह पाहून उभारी येते, असेदेखील त्यांनी नंतर म्हटले. त्यांच्या या वक्तव्याची राजकीय वर्तुळात चांगलीच चर्चा होत आहे. त्यांच्या या वक्तव्याबाबत मराठा नेते मनोज जरांगे पाटील यांना प्रश्न विचारण्यात आला. त्यावर मनोज जरांगे यांनी प्रतिक्रिया दिली. यावेळी त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार धनंजय मुंडे



यांच्यावर घणाघात केला.

''पंकजा मुंडे रिटायर झाल्या तर हा (धनंजय मुंडे) सगळ्या दुनियेत धिंगाणा घालेल. वारसाच मोडला मंग. दिवंगत नेते गोपीनाथ मुंडे साहेबांचा वारसा चालवण्याची हिंमत पंकजा मुंडेंकडे आहे. खूप गरिबीतली जात त्यांनी वर काढलेली आहे आणि या जर बाजूला गेल्या तर ती जात पूर्ण जेलमध्ये घालेल हा, गोरगरिबांना अन्नापासून वंचित करेल हा'', असा घणाघात मनोज जरांगे यांनी नाव न घेता धनंजय मुंडे यांच्यावर केला. ''यापुढे मराठ्यांच्या नादी लागायचे नाही. मराठ्यांसोबत मारामारी बंद. नाहीतर मी पक्क्या आहे. दोन-तीन वेळा तुला वाचवले आहे. नाहीतर तुला मध्ये घालीन. माझ्या खुनाच्या कटात शंभर टक्के तू आहेस. मात्र तुला वाचवलेले आहे'', असा आरोप मनोज जरांगे यांनी पुन्हा केला. ''माझ्या घातपाताच्या प्रकरणात तू आहेस. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार आणि शुक्ला यांना घेऊन बसलास. तिथे तुला वाचवले, तो सगळा डाटा फडणवीसांकडे आहे. तो कधी पण बाहेर येऊ शकतो, हे मी जबाबदारीने बोलत आहे'', असा

▶▶ पान २ वर

# प्रशांत किशोर यांचा भाजपच्या बालेकिल्ल्यात ऐतिहासिक विजय

## बांकीपूर पोटनिवडणुकीत मारली बाजी

पाटणा । वृत्तसंस्था

बिहारमधील बांकीपूर पोटनिवडणुकीत जनसुराज पक्षाचे प्रमुख प्रशांत किशोर यांनी प्रचंड बहुमत मिळवत दणदणीत विजय नोंदवला आहे. एकूण ३१ फेऱ्यांच्या मतमोजणीअंती प्रशांत किशोर (पीके) यांना ६३,२०३ मते मिळाली. त्यांनी भाजपच्या नीरज सिन्हा यांचा पराभव केला, ज्यांना ४४,२५० मते मिळाली. तर राष्ट्रीय जनता दलाच्या (आरजेडी) रेखा कुमारी १४,०८५ मतांसह तिसऱ्या



क्रमांकावर राहिल्या.

मतमोजणीच्या पहिल्या फेरीपासूनच जनसुराज पक्षाच्या प्रशांत किशोर यांनी घेतलेली आघाडी शेवटच्या फेरीपर्यंत कायम ठेवली. या बांकीपूर पोटनिवडणुकीसाठी ३० जुलै रोजी मतदान पार पडले होते, ज्यामध्ये सुमारे ३५ टक्के मतदारांनी आपला हक्क बजावला होता.

बांकीपूर पोटनिवडणुकीच्या निकालांवर बिहार भाजपचे प्रदेशाध्यक्ष संजय सरावगी म्हणाले, ''आम्ही बांकीपूरमध्ये सातत्याने विकासकामे केली आहेत आणि पुढेही बांकीपूर आमच्या

▶▶ पान २ वर

# सर्वोच्च न्यायालयातील न्यायाधीशांची संख्या ३४ वरून ३८ पर्यंत वाढवणार; लोकसभेत विधेयक मंजूर

दिल्ली । वृत्तसंस्था

नीट पेपरफुटी आणि राम मंदिराच्या देणग्यांमध्ये कथित चोरी या मुद्द्यांवरून विरोधी पक्षाच्या सदस्यांनी घोषणाबाजी सुरूच ठेवल्यामुळे सर्वोच्च न्यायालयातील न्यायाधीशांची संख्या ३४ वरून ३८ पर्यंत वाढवणारे विधेयक लोकसभेत सोमवारी चर्चेविना मंजूर करण्यात आले. गेल्या आठवड्यातही अशाच गोंधळात जन्म-मृत्यू नोंदणी कायद्यात सुधारणा करणारे विधेयक लोकसभेत चर्चेविना मंजूर करण्यात आले होते.

हे विधेयक केंद्रीय कायदा आणि न्याय मंत्री अर्जुन राम मेघवाल यांनी सभागृहात सादर केले. सर्वोच्च न्यायालय (न्यायाधीशांची संख्या)



सुधारणा विधेयक, २०२६ हे १९५६ च्या संविधानात सुधारणा करते. या सुधारणेअंतर्गत, सरन्यायाधीशांना वगळून न्यायाधीशांची (कनिष्ठ न्यायाधीश) कमाल संख्या ३३ वरून ३७करण्यात आली आहे. याचा अर्थ, सरन्यायाधीशांसह

▶▶ पान २ वर

# सुनेत्रा पवार-प्रफुल्ल पटेल यांच्यात वर्चस्वाची लढाई?

## राष्ट्रवादीतील वर्चस्वाच्या नव्या संघर्षाची चाहूल

पुणे । प्रतिनिधी

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात पुन्हा एकदा अंतर्गत सत्तासंघर्षाची चर्चा रंगू लागली आहे. पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षा सुनेत्रा पवार आणि ज्येष्ठ नेते प्रफुल्ल पटेल यांच्यात पक्षावरील प्रभाव आणि अधिकार यावरून मतभेद वाढत असल्याच्या पार्श्वभूमीवर केंद्रीय निवडणूक आयोगाच्या एका पत्राने या चर्चांना अधिक बळ मिळाले आहे. आयोगाने पक्षाच्या राष्ट्रीय कार्यकारिणीच्या बैठकीत मंजूर करण्यात आलेल्या ठरावांच्या प्रती मागवल्याने हा विषय केवळ संघटनात्मक न राहता कायदेशीर आणि राजकीयदृष्ट्याही महत्त्वाचा ठरला आहे.

२६ फेब्रुवारी रोजी राष्ट्रवादी काँग्रेसची राष्ट्रीय कार्यकारिणीची बैठक झाली होती. या बैठकीत पक्षाच्या घटनेतील कलम ६, ७, १२, १८(१), ३२ आणि ३६ मध्ये बदल करण्यात आल्याचे आयोगाला कळविण्यात आले होते. त्याच बैठकीत सुनेत्रा पवार यांची राष्ट्रीय अध्यक्षा



म्हणून निवड झाल्याचेही जाहीर करण्यात आले. मात्र, आयोगाच्या म्हणण्यानुसार पक्षाकडून पाठविण्यात आलेल्या कागदपत्रांमध्ये केवळ कलम १८(१) संदर्भातील ठरावाची प्रत देण्यात आली आहे. इतर कलमांमध्ये बदल करण्यासाठी कार्यकारिणीने मंजूर केलेल्या ठरावांच्या प्रती आयोगाला मिळालेल्या नाहीत. त्यामुळे आयोगाने सर्व संबंधित ठरावांच्या प्रमाणित प्रती सादर करण्याचे निर्देश दिले आहेत. निवडणूक आयोग कोणत्याही नोंदणीकृत राजकीय पक्षाच्या घटनेत झालेल्या बदलांची नोंद अधिकृत कागदपत्रांच्या आधारेच स्वीकारतो. पक्षाच्या कार्यकारिणीने घटनादुरुस्तीचा ठराव

▶▶ पान २ वर

### तर गटबाजी उघड होईल

“ आयोगाकडे सर्व ठरावांच्या प्रती सादर झाल्यानंतर त्यांच्या वैधतेची तपासणी होईल. आवश्यक कागदपत्रे योग्य आढळल्यास घटनादुरुस्तीची प्रक्रिया पुढे जाईल. कागदपत्रांमध्ये विसंगती आढळल्यास आयोगाकडून अतिरिक्त स्पष्टीकरण किंवा पुढील सुनावणीची शक्यता आहे. या प्रक्रियेदरम्यान पक्षातील अंतर्गत गटबाजी आणखी उघड होण्याची शक्यता नाकारता येत नाही.






cmyk

## अग्रलेख

# ईएमआय पुन्हा वाढणार? आरबीआयच्या निर्णयाकडे देशाचे लक्ष

भारतीय रिझर्व्ह बँकेच्या पतधोरण समितीची ऑगस्ट २०२६ मधील तीन दिवसांची बैठक ३ ऑगस्टपासून सुरू झाली असून, ५ ऑगस्ट रोजी गव्हर्नर संजय मल्होत्रा अंतिम निर्णय जाहीर करणार आहेत. हा निर्णय केवळ बँकिंग क्षेत्रापुरता मर्यादित नसून देशातील गृहकर्जधारक, वाहन कर्ज घेणारे, उद्योग, गुंतवणूकदार आणि बचतदार अशा सर्वांवर त्याचा थेट परिणाम होणार आहे. आरबीआय चे प्रमुख उद्दिष्ट महागाई नियंत्रणात ठेवणे, आर्थिक विकासाला चालना देणे आणि देशातील वित्तीय स्थैर्य टिकवणे हे आहे. यासाठी दर दोन महिन्यांनी एमपीसी बैठक घेऊन रेपो दरासह महत्त्वाचे धोरणात्मक निर्णय घेतले जातात. या समितीत सहा सदस्य असतात. त्यापैकी तीन सदस्य चे आणि तीन सदस्य केंद्र सरकारकडून नियुक्त केलेले असतात. बहुमताच्या आधारे व्याजदर निश्चित केला जातो.

रेपो दर म्हणजे व्यावसायिक बँकांना अल्पकालीन निधी ज्या व्याजदराने उपलब्ध करून देते तो दर. सध्या हा दर ५.२५ टक्के आहे. रेपो दर वाढल्यास बँकांचा निधी महाग होतो आणि त्याचा परिणाम गृहकर्ज, वाहन कर्ज, वैयक्तिक कर्ज आणि व्यावसायिक कर्जाच्या व्याजदरांवर होतो. परिणामी कर्जदारांच्या वाढू शकतात. उलट रेपो दर कमी झाल्यास कर्जावरील व्याज कमी होण्याची शक्यता निर्माण होते. बहुतेक अर्थतज्ज्ञांचा अंदाज आहे की, यावेळी रेपो दरात तातडीने बदल न करता तो कायम ठेवू शकते. मात्र बाजाराचे लक्ष केवळ व्याजदरावर नसून च्या धोरणात्मक भूमिकेकडे आहे. महागाई, जागतिक आर्थिक परिस्थिती आणि आगामी काळातील संकेत यावरून पुढील काही महिन्यांत व्याजदर वाढतील की कमी होतील, याचा अंदाज घेतला जाईल. सध्या आरबीआयला महागाई नियंत्रणात ठेवतानाच आर्थिक विकासालाही गती देण्याचे दुहेरी आव्हान आहे. व्याजदर वाढल्यास उद्योगांसाठी कर्ज महाग होते, गुंतवणूक कमी होऊ शकते आणि रोजगार निर्मितीवर परिणाम होऊ शकतो. दुसरीकडे व्याजदर खूप कमी ठेवल्यास बाजारात पैशांचा पुरवठा वाढून महागाई वाढण्याचा धोका असतो. याशिवाय जागतिक परिस्थितीही भारतासाठी महत्त्वाची ठरत आहे. कच्च्या तेलाच्या किमतीतील चढ-उतार, भूराजकीय तणाव आणि जागतिक आर्थिक अनिश्चितता यामुळे आयात खर्च वाढू शकतो. भारत आपल्या कच्च्या तेलाच्या गरजेपैकी सुमारे ८५ टक्के तेल आयात करतो. त्यामुळे तेल महाग झाल्यास वाहतूक, उत्पादन खर्च आणि अखेरीस महागाईवर परिणाम होतो. समजा एखाद्या व्यक्तीने ५० लाख रुपयांचे गृहकर्ज २० वर्षांसाठी घेतले आहे. अशा परिस्थितीत व्याजदरात ०.२५ टक्क्यांची वाढ झाली तर मासिक काहीशे रुपयांनी वाढू शकते. संपूर्ण कर्जाच्या कालावधीत ही वाढ लाखो रुपयांच्या अतिरिक्त व्याजामध्ये रूपांतरित होऊ शकते. त्यामुळे रेपो दरातील अगदी छोटा बदलही कर्जदारांच्या मासिक अर्थसंकल्पावर परिणाम करतो. व्याजदर वाढल्यास अनेक बँका मुदतठेवींवर अधिक व्याज देण्याची शक्यता असते. त्यामुळे ज्येष्ठ नागरिक, निवृत्त व्यक्ती आणि नियमित बचत करणाऱ्यांना फायदा होऊ शकतो. मात्र याच वेळी कर्जदारांवरील आर्थिक भार वाढतो. त्यामुळे चा प्रत्येक निर्णय वेगवेगळ्या घटकांवर वेगवेगळा परिणाम घडवतो. आरबीआय च्या निर्णयाकडे शेअर बाजाराचेही बारकाईने लक्ष असते. व्याजदर वाढल्यास रिअल इस्टेट, वाहन आणि कर्जावर अवलंबून असलेल्या क्षेत्रांवर दबाव येऊ शकतो. तर व्याजदर स्थिर राहिल्यास किंवा भविष्यासाठी सकारात्मक संकेत मिळाल्यास गुंतवणूकदारांचा आत्मविश्वास वाढण्याची शक्यता असते. ज्यांचे कर्ज फ्लोटिंग व्याजदरावर आहे त्यांनी बँकेकडून व्याजदरातील बदलांची माहिती नियमित घ्यावी. शक्य असल्यास अतिरिक्त रक्कम भरून मूळ कर्ज कमी करण्याचा विचार करावा. बचतदारांनी नवीन करण्यापूर्वी विविध बँकांचे व्याजदर तपासावेत. कोणताही आर्थिक निर्णय अफवांवर नव्हे, तर च्या अधिकृत घोषणेनंतरच घ्यावा. ५ ऑगस्ट रोजी जाहीर होणारा आरबीआय चा निर्णय हा केवळ एका व्याजदराचा निर्णय नसेल. तो देशातील कर्जदार, बचतदार, उद्योग, गुंतवणूकदार आणि एकूणच भारतीय अर्थव्यवस्थेच्या आगामी दिशेचा महत्त्वाचा संकेत ठरणार आहे. त्यामुळे संपूर्ण देशाचे लक्ष आता या घोषणेकडे लागले आहे.

# अधिकारी कर्मचाऱ्यांनी नागरिकांना केंद्र बिंदू ठेवून महसूल विभागाने काम करणे आवश्यक-जिल्हाधिकारी आशिमा मित्तल

## • जिल्हाधिकारी कार्यालयात महसूल दिन साजरा



**जालना । प्रतिनिधी**

**महसूल विभागाने आपल्या प्रत्येक कामामध्ये नागरिकांना केंद्रबिंदू मानून पारदर्शक, गतिमान आणि लोकाभिमुख सेवा देणे ही काळाची गरज असल्याचे प्रतिपादन जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी केले.**

जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात आयोजित महसुल दिन कार्यक्रमात त्या बोलत होत्या यावेळी अपर जिल्हाधिकारी रमेश मिसाळ, सहायक जिल्हाधिकारी आर रंगमंजु, निवासी उपजिल्हाधिकारी शशीकांत हदगल, अतिरिक्त पोलीस अधिक्षक विक्रम साळी, उपजिल्हाधिकारी मनिषा देशपांडे, उप विभागीय अधिकारी रामदास दौंड, पद्माकर गायकवाड, उमाकांत पारधी, रामेश्वर रोडगे, जिल्हा नियोजन अधिकारी सूचित कुलकर्णी, तहसीदार नायब तहसीदार संघटनेचे अध्यक्ष रमेश पागोटे, कर्मचारी मध्यवर्ती संघटनेचे पी.बी. मते, महसुल कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष राजेंद्र शिंदे, महाराष्ट्र राज्य तलाठी संघाचे अध्यक्ष संदीप नरुटे, लघुलेखक संघटनेचे अध्यक्ष योगेश वाघ, वाहन चालक संघटनेचे अध्यक्ष योगेश कुरेवाड, महसुल चतुर्थ श्रेणी कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष शाम विभुते, महसुल सेवक संघटनेचे अध्यक्ष संदीप धारे, पोलीस पाटील अर्जून ढगे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी जिल्हाधिकारी मित्तल म्हणाल्या की, महसुल विभाग कोणतीही समस्या किंवा परिस्थितीमध्ये आपले कर्तव्य पार पाडण्याकरीता सदैव उभा राहतो. महसूल विभाग हा शासनाच्या प्रशासनाचा कणा असून नागरिकांना विविध शासकीय सेवा प्रभावीपणे उपलब्ध करून देण्यात या विभागाची महत्त्वपूर्ण भूमिका आहे. मागील एक वर्षात महसुल विभागाने पुर परिस्थिती यशस्वीपणे हाताळली, पारदर्शकपणे पोलीस पाटील भरती प्रक्रिया पार पाडली, छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान, विविध निवडणूका, जनगणना, एसआयआर आदी कामे यशस्वीपणे पार पाडली. याकरीता मी सर्व महसुल अधिकारी-कर्मचाऱ्यांचे अभिनंदन करते. सद्यपरिस्थितीत आपले काम वाढलेले आहे. परंतु आपण आपले कुटूंब आणि काम यामध्ये समतोल राखुन कर्तव्य पार पाडणे आवश्यक आहे. यापुढेही आपण चांगले काम करु. यावेळी अपर जिल्हाधिकारी रमेश मिसाळ म्हणाले की, महसूल विभाग केवळ जमीन व महसुलाशी संबंधित कामकाजापुरता मर्यादित नसून आपत्ती व्यवस्थापन, निवडणुका, नैसर्गिक संकटांतील मदत, विविध शासकीय योजनांची अंमलबजावणी, तसेच नागरिकांना वेळेत आणि पारदर्शक सेवा देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य पार पाडतो. महसूल विभागाने संवेदनशीलता, पारदर्शकता या तत्त्वांवर काम करून नागरिकांना दर्जेदार सेवा देण्यासाठी कटिबद्ध रहावे, असे त्यांनी सांगितले. यावेळी महेंद्र गिरगे यांनी भाषण तसेच उपविभागीय अधिकारी श्री दौंड यांनी समायोचित मार्गदर्शन केले. प्रास्ताविकात निवासी उपजिल्हाधिकारी शशिकांत हदगल यांनी, महसुल विभागाने मागील एक वर्षात पार पाडलेल्या विविध उल्लेखनीय कामाचे सादरीकरण करुन महसुल दिनाचे महत्व सांगितले. यावेळी कार्यक्रमात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या महसूल अधिकारी व कर्मचाऱ्यांचा तसेच त्यांच्या गुणवंत पाल्यांचा सत्कार करण्यात आला. तसेच महसूल विभागाच्या कार्याचा आढावा घेऊन सेवा वितरण अधिक परिणामकारक करण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी तहसीलदार, नायब तहसीलदार, मंडळ अधिकारी, तलाठी तसेच महसूल विभागातील अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# यशस्वी होण्यासाठी प्रभावी नियम-डॉ.जगदीश टेकाळे



**बीड । प्रतिनिधी**

**यशाची गुरुकिल्ली म्हणून दृढनिश्चय, कौशल्य, आवड आणि शिस्त आणि नशीब हे पाच नियम उपयोगी ठरु शकतात. या नियमांमध्ये सतत शिकणे,वचनबध्द राहणे, पैशांची गुंतवणुक करणे, सकारात्म लोकांच्या सान्निध्यात राहणे आणि चुकांमधून शिकणे यांचा समावेश होतो.**

दृढनिश्चय आणि आवड - ध्येय गाठण्यासाठी दृढनिश्चय असणे महत्त्वाचे आहे. तुमच्या आवडीच्या क्षेत्रात काम केल्याने यश मिळवणे सोपे होते. कौशल्य आणि शिस्त- नवीन कौशल्ये आत्मसात करणे आणि त्यांच्या सरावासाठी शिस्तबध्दतेमुळे तुम्ही तुमची उद्दिष्टये पूर्ण करु शकता. पैसे आणि गुंतवणूक-पैशांचा वापर केवळ खर्च करण्यासाठी न करता, त्यांना हुशारीने गुंतवा. भविष्यात याचा फायदा होतो. असे मत डॉ.जगदीश श्रीराम टेकाळे एम.बी.बी.एस., एम.डी.मानसोपचार तज्ञ (गोल्ड मॅडॅलिस्ट)न्युरो सायकियाट्रिस्ट, व्यसनमुक्ती तज्ञ, सेक्सोलॉजीस्ट यांनी व्यक्त केले. डॉ.जगदीश टेकाळे महिन्याच्या दुसऱ्या व चौथ्या रविवारी बीड शहरात साई(गावते कॉम्प्लेक्स, डी.पी.रोड,डॉक्टर लाईन,बस स्टॅण्डच्या पाठीमागे येथे उपलब्ध असतात.

# लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती उत्साहात; गरजू विद्यार्थ्यांना गणवेशाचे वाटप

माजलगाव । प्रतिनिधी

क्रांतीसूर्य लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंती निमित्ताने माजलगाव शहरात सामाजिक बांधीलकी जपणाऱ्या विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.शहरातील प्रमुख डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक येथे भव्य साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांचा अर्धकृती पुतळा व मनमोहक देखावा दिवसभर अभिवादनासाठी ठेवण्यात आला होता,अत्यंत उत्साही आणि प्रेरणादायी वातावरणात हा सोहळा पार पडला.शालेय विद्यार्थ्यांना गणवेश वाटप जयंतीचे औचित्य साधून



सामाजिक जाणिवेतून शालेय विद्यार्थ्यांना मोफत गणवेशाचे वाटप करण्यात आले. शिक्षणापासून कोणीही वंचित राहू नये आणि विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढावा,या उद्देशाने हा स्तुत्य उपक्रम दरवर्षी राबविण्यात येतो तसा याही वर्षी करण्यात आला. गणवेश मिळाल्यानंतर विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरचा आनंद ओसंडून वाहत होता. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते या गरजू विद्यार्थ्यांना गणवेश सुपूर्द करण्यात आले.

आंबेडकर चौकात निळा ध्वज फडकवलायानंतर शहरातील मुख्य केंद्रबिंदू असलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक येथे 'गगनभेदी घोषणांच्या जयघोषात निळ्या ध्वजाचे सन्मानपूर्वक ध्वजारोहण करण्यात आले. हा सोहळा पाहण्यासाठी समाजबांधवांनी मोठी गर्दी केली होती.अण्णाभाऊंच्या विचारांचा वारसा पुढे नेण्याचा संकल्प यावेळी सर्वांनी सामूहिकरीत्या केला.या कार्यक्रमाला शहरातील आझाद क्रांती सेनाचे प्रमुख राजेश घोडे, माजी नगरसेवक शिवाजी सुतार,अभय होके पाटील,डॉ. ज्ञानेश्वर गिलभीले,डॉ. दिनकर मस्के,अरुण राऊत,माजी नागराध्यक्ष अशोक तिडके,अशोक कदम,गुड्डू पटेल यांच्या हस्ते विदयार्थ्यांना गणवेश वाटप करण्यात आले. तसेच या कार्यक्रम चे अध्यक्ष बाबासाहेब ढगे यांच्या हस्ते निळ्या ध्वजाचे ध्वजारोहन करण्यात आले या वेळी जेष्ठ नेते दयानंद स्वामी यांची प्रमुख उपस्थिती होती.तसेंच या सोहळ्यास कचरु कांबळे,भरत मिसाळ,अकबर शेख,नुमान चाऊस,महादेव कांबळे,अप्पा भरस्कार,भरत जाधव,शाहीर साळवे व पत्रकार या जयंती सोहळ्यात उपस्थित होते. अनेक प्रतिष्ठित नागरिक, सामाजिक कार्यकर्ते,तरुण मंडळी आणि महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी जयंती उत्सव समितीचे अशोक ढगे,कृष्णा मुजमुले,किसन भिसे,तुकाराम जाधव,राहुल गायकवाड,विनोद ढगे,नवनाथ लोखंडे,अनिल ढगे,अतुल अलझेंडे,आकाश हातागले,किशोर ढगे,सौरभ कांबळे,बाळू ढगे, यांनी अत्यंत परिश्रम घेतले.अत्यंत शिस्तबद्ध आणि उत्साही वातावरणात संपन्न झालेल्या या उपक्रमाचे माजलगाव शहरात सर्व स्तरांतून भरभरून कौतुक होत आहे.

# दोन हॉटेलवर अन्न औषध प्रशासनाची कारवाई

**बीड । प्रतिनिधी**

**अन्न औषध प्रशासन आयुक्त तुकाराम मुंडे यांनी पदभार घेतल्यापासून राज्यांमध्ये भेसळ खोरावर कारवाईचा धडाका सुरू केला आहे यामध्ये तेल, तूप,दूध अन्य अन्न पदार्थात भेसळ करणारावर धडक कारवाई करण्यात आल्या आहेत यामुळे भेसळखोराचे धाबे दणाणले आहेत.**

बीड नागरिकांच्या आरोग्याशी तडजोड करणाऱ्या खाद्यव्यवसायांवर अन्न व औषध प्रशासनाने सोमवारी धडक कारवाई करत अंबाजोगाईतील सदर बाजार परिसरातील तवक्कल चायनीज सेंटर व केज येथील एक विनापरवाना चालणारे हॉटेल सील केले.या कारवाईदरम्यान खाद्यपदार्थ व कच्च्या साहित्याचे नमुने तपासणीसाठी जप्त करण्यात आले असून, संबंधित आस्थापना आवश्यक परवाना मिळेपर्यंत बंद ठेवण्याचे आदेश देण्यात आले आहेत. आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या निर्देशानुसार ऑनलाइन प्राप्त झालेल्या तक्रारीची तातडीने दखल घेण्यात आली. त्यानुसार ३ ऑगस्ट रोजी सायंकाळी साडेचारच्या सुमारास अन्न सुरक्षा अधिकारी अ. दि. नरवाडे यांच्या पथकाने आंबेजोगाई शहरातील तवक्कल चायनीज सेंटरवर छापा टाकला. तपासणीदरम्यान हॉटेलचे मालक इम्रान अनवर कुरेशी हे आवश्यक परवान्याशिवाय व्यवसाय करत असल्याचे तसेच आस्थापनात मोठ्या प्रमाणात अस्वच्छता असल्याचे निदर्शनास आले. खाद्यपदार्थ तयार करण्यासाठी वापरले जाणारे कच्चे साहित्य व इतर अन्नपदार्थांचे नमुने तपासणीसाठी ताब्यात घेण्यात आले. दूध,तेल,तूप, पनीर यासह सर्वच अन्नपदार्थात भेसळ करणारावर कठोर कारवाया करण्यात येणार असल्याची माहिती अन्न व सुरक्षा अधिकारी नरवाडे यांनी दिली आहे.

# प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेत जि.प.शाळा पिंपळवंडीच्या विद्यार्थिनी पात्र

**पिंपळवंडी । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पुणे आयोजित प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इयत्ता ४ थी) सन २०२६ मध्ये जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पिंपळवंडी ता.पाटोदा या शाळेच्या विद्यार्थिनींनी उल्लेखनीय यश संपादन केले आहे.या पात्र विद्यार्थिनींचे सर्व स्तरातून स्वागत होत असून यशस्वी विद्यार्थिनींचे अभिनंदन केले जात आहे.पात्र



विद्यार्थिनींनी मध्ये कु.स्नेहल सचिन पवार १८६ गुण,कु.यशश्री सूर्यकांत उकांडे १७४ गुण,कु.कल्याणी सतीश पवार १५८ गुण,कु.कोमल मच्छिंद्र शिंदे १३६ गुण,कु.धनश्री संतोष कांबळे १२८ गुण,कु.प्रियंका जाधव १६०गुण, कु.श्रेया शिंदे १४४ गुण त्यांच्या या यशामागे असलेले त्यांचे कठोर परिश्रम पालकांचे,शिक्षकांचे मोलाचे मार्गदर्शन शाळा व्यवस्थापन समितीचे सहकार्य निश्चित प्रेरणादायी ठरले आहे.या घवघवीत यशाबद्दल सर्व यशस्वी विद्यार्थिनींचे त्यांचे पालक,वर्गशिक्षक,सर्व शिक्षक-वृंद व शाळा व्यवस्थापन समिती यांचे ग्रामस्थांनी अभिनंदन करून कौतुक केले आहे.

# क्रांतीसिंह नानासाहेब पाटील यांना जिल्हाधिकारी कार्यालयात अभिवादन

**जालना । प्रतिनिधी**

थोर स्वातंत्र्यसेनानी क्रांतीसिंह नानासाहेब पाटील यांची जयंती जिल्हाधिकारी कार्यालयात साजरी करण्यात आली. जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. याप्रसंगी निवासी उपजिल्हाधिकारी शशिकांत हदगल, नायब तहसिलदार तुषार



निकम, विक्रांत मोंढे, किशोर तायडे, सहाय्यक महसुल अधिकारी आदी कर्मचारी उपस्थित होते.

## पान १ वरून...

### आज शेतकऱ्यांच्या कर्ज

निर्णयामुळे लाखो शेतकऱ्यांना दिलासा मिळणार असून, आगामी खरीप हंगामासाठी नव्याने पीक कर्ज घेण्यास मोठी मदत होणार आहे.

--------------

### पंकजा मुंडे निवृत्त झाल्या तर

दावा जरांगे यांनी केला. ''तू पाप करायचे बंद केले आणि मराठ्यांना त्रास देणे बंद केले तर काहीतरी होईल. नाहीतर तुझे वाईट दिवस येणार. चांगले दिवस येणार नाहीत'', अशी टीका मनोज जरांगे यांनी केली. ''महादेव मुंडे प्रकरणातील आरोपींना मध्ये टाक असे म्हणायला पाहिजे. तिथे तोंड उचलत नाही. खून करणारे, चोरी करणारे, खंडणी मागणाऱ्यांचे समर्थन करायला लागला म्हणून धन्या संपला'', अशी टीका देखील जरांगेंनी केली. ''जातीपातीचे राजकारण यानेच आणले, सगळ्याच जातीपातीच्या लोकांचा कार्यक्रम केला. बलात्कार करणाऱ्याला सांभाळावे लागेल, असे म्हणतो. आता तू पश्चाताप करायला लागला. तुला उशिरा का होईना शहाणपण आले. बरे झाले. तुझ्यामुळे बहिणीला सुद्धा भोगावे लागतेय. फक्त तुझ्यामुळे'', असादेखील घणाघात मनोज जरांगे पाटील यांनी केला. ''जेव्हा काळ होता तेव्हा नीट खाता आले नाही. मराठ्यांसह सगळ्या जातींनी मोठं केलं आणि टोळीने ओरबाडून खाल्लं. ना ओबीसी मोठा होऊ दिला, ना मराठा मोठा होऊ दिला, मारामारीत वेळ जास्त घातला. तू शहाणा हो. मराठ्यांच्या नादी लागू नको. कोणताही पक्ष, कोणीही तुला जवळ करणार नाहीत. काळ गेला. आता मध्ये जायची वेळ आली आहे'', असे मनोज जरांगे पाटील म्हणाले.

--------------

### पंतप्रधानांचा व्हिडिओ हटविल्याप्रकरणी

आणि सोशल मीडिया प्लॅटफॉर्मच्या उत्तरदायित्वाशी संबंधित मुद्द्यांची तपासणी करत असताना ही चर्चा झाली. पंतप्रधानांचा व्हिडिओ फेसबुकवर काही काळासाठी प्रतिबंधित का करण्यात आला होता, हे स्पष्ट करण्यासाठी केंद्राने मेटाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना बोलावल्यानंतर काही दिवसांनी ही संसदीय छाननी होत आहे. इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालयाचे सचिव एस. कृष्णन यांनी गुरुवारी सांगितले, ''काय घडत आहे हे स्पष्ट करण्यासाठी आम्ही मेटाला सर्वोच्च स्तरावर बोलावून स्पष्टीकरण देण्यास सांगितले आहे.'' २३ जुलै रोजी मध्यरात्रीच्या थोड्या वेळापूर्वी पोस्ट केलेला हा व्हिडिओ, कथित नीट-यूजी पेपरफुटीवरून देशभरात सुरू असलेल्या आंदोलनांच्या पार्श्वभूमीवर मोदींचा विद्यार्थ्यांना दिलेला पहिला सार्वजनिक संदेश होता.

--------------

### सवोच्च न्यायालयातील न्यायाधीशांची संख्या ३४

सर्वोच्च न्यायालयाची एकूण मंजूर संख्याबळ आता ३४ वरून ३८ न्यायाधीशांपर्यंत वाढेल. हे विधेयक मे २०२६ मध्ये राष्ट्रपतींनी जारी केलेल्या अध्यादेशाची जागा घेईल. सर्वोच्च न्यायालयातील प्रकरणांचा वाढता अनुशेष पाहता न्यायाधीशांची संख्या वाढवणे ही काळाची गरज बनली आहे, असे सरकारचे म्हणणे आहे. सरकारच्या मते, चार अतिरिक्त न्यायाधीशांच्या नियुक्तीमुळे सरन्यायाधीशांना अधिक नियमितपणे घटनापीठांची स्थापना करणे सोपे जाईल. यामुळे नियमित अपील आणि इतर प्रकरणांच्या सुनावणीलाही गती मिळेल. यामुळे घटनात्मक महत्त्वाची दीर्घकाळ प्रलंबित असलेली प्रकरणे आणि सामान्य अपील या दोन्हींचा निपटारा जलद होण्याची अपेक्षा आहे. सरकारने या विधेयकाच्या आर्थिक परिणामाचेही मूल्यांकन केले आहे. यानुसार, या निर्णयावरील सुरुवातीचा खर्च अंदाजे १४.०४ कोटी असेल. दरम्यान, १ जानेवारीपर्यंत सर्वोच्च न्यायालयात ९२,१०१ खटले प्रलंबित होते. २०१९ पासून सर्वोच्च न्यायालयात मंजूर असलेल्या ३४ न्यायाधीशांच्या पूर्ण क्षमतेच्या जवळपास काम सुरू असूनही, २०२५ मध्ये तिथे ७५,४१० नवीन प्रकरणे दाखल झाली, तर ६५,६१५ प्रकरणांचा निपटारा करण्यात आला.

--------------

### प्रशांत किशोर यांचा भाजपच्या

प्राधान्यक्रमावर राहील. येथील जनता आमचीच आहे. आम्हाला अपेक्षेपेक्षा कमी मते का मिळाली, याची आम्ही सखोल समीक्षा करू. विजयी उमेदवार प्रशांत किशोर यांचे मी आधीच अभिनंदन करतो.'' विजयी वाटचालीदरम्यान बोलताना प्रशांत किशोर यांनी केंद्र आणि राज्य सरकारवर जोरदार निशाणा साधला. ते म्हणाले, ''केंद्र असो वा राज्य सरकार, त्यांनी तरुणांच्या शिक्षणावर आणि रोजगारावर काम करायला हवे. तसे केले नाही तर अशीच अवस्था होईल. एखाद्या गुन्हेगारी पार्श्वभूमीच्या व्यक्तीला बिहारचा राजा बनवले तर राज्याची प्रगती होणार नाही. बिहारच्या जनतेचीही मोदीजींना हीच विनंती आहे की, त्यांनी अशा चांगल्या व्यक्तीला मुख्यमंत्री करावे जो आपल्या मुलांचे शिक्षण, रोजगार आणि भविष्याचा विचार करेल.''जनतेने मला आशीर्वाद दिला आहे, त्यामुळे संसदेत/सभेत त्यांची बाजू भक्कमपणे मांडणे हे माझे पहिले कर्तव्य असेल. जनतेने भाजपला स्पष्ट संदेश दिला आहे की, तुम्ही कोणत्याही कुशवाहा नेत्याला मुख्यमंत्री करा, पण तो व्यक्ती चांगला आणि बिहारच्या विकासासाठी काम करणारा असावा.''

### ३० वर्षांच्या घराणेशाहीला सुरूंग

बांकीपूर विधानसभा मतदारसंघ (पूर्वीचा पटना पश्चिम) हा भाजपचा १९९५ पासूनचा अभेद्य गड मानला जात होता. तब्बल ३० वर्षांपेक्षा जास्त काळ या मतदारसंघावर एकाच कुटुंबाचे वर्चस्व राहिले आहे. आधी भाजप नेते नवीन किशोर प्रसाद सिन्हा आणि त्यानंतर त्यांचे पुत्र नितीन नबीन यांनी सलग पाच वेळा या मतदारसंघाचे प्रतिनिधित्व केले आहे. भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून निवड झाल्यानंतर नितीन नबीन यांनी राज्यसभा खासदारकीसाठी बांकीपूरच्या आमदारकीचा राजीनामा दिला होता. त्यामुळे ही पोटनिवडणूक पार पडली.


------------

### सुनेत्रा पवार-प्रफुल्ल पटेल

मंजूर केला असल्याचा ठोस पुरावा आयोगाकडे असणे आवश्यक असते. जर आवश्यक ठरावांच्या प्रती उपलब्ध झाल्या नाहीत किंवा प्रक्रियेमध्ये त्रुटी आढळल्या, तर आयोग संबंधित घटनादुरुस्तीची नोंद घेण्यास विलंब करू शकतो किंवा अधिक स्पष्टीकरण मागवू शकतो. त्यामुळे या पत्राचे राजकीय परिणामही होऊ शकतात. राजकीय निरीक्षकांच्या मते, आयोगाने मागविलेली कागदपत्रे वेळेत किंवा समाधानकारक स्वरूपात सादर झाली नाहीत, तर पक्षातील नेतृत्व बदल आणि घटनादुरुस्तीच्या प्रक्रियेवर प्रश्नचिन्ह निर्माण होऊ शकते. अशा परिस्थितीत प्रफुल्ल पटेल समर्थक गटाला आपल्या भूमिकेला बळ देण्याची संधी मिळू शकते. प्रफुल्ल पटेल हे पक्षातील अनुभवी आणि संघटनात्मकदृष्ट्या प्रभावी नेते मानले जातात. त्यामुळे पक्षातील नेतृत्वाच्या निर्णयांबाबत त्यांची भूमिका भविष्यात अधिक महत्त्वाची ठरू शकते, अशी चर्चा सुरू झाली आहे. राष्ट्रवादी काँग्रेससाठी हा केवळ कागदोपत्री विषय नाही. पक्षाच्या राष्ट्रीय नेतृत्वाची वैधता, संघटनात्मक निर्णयांची पारदर्शकता आणि भविष्यातील सत्ताकारण यावर या प्रकरणाचा परिणाम होऊ शकतो. विशेषतः आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर पक्षातील नेतृत्व एकसंध राहते की अंतर्गत संघर्ष अधिक तीव्र होतो, याकडे राज्याच्या राजकारणाचे लक्ष लागले आहे. सध्या निवडणूक आयोगाने केवळ आवश्यक कागदपत्रांची मागणी केली आहे. आयोगाने अद्याप कोणताही अंतिम निष्कर्ष किंवा निर्णय दिलेला नाही. त्यामुळे ''सुनेत्रा पवार आणि प्रफुल्ल पटेल यांच्यात वर्चस्वाची लढाई'' या चर्चांना राजकीय वर्तुळात उधाण आले असले, तरी त्याबाबतचा अंतिम निष्कर्ष आयोगाच्या पुढील भूमिकेनंतरच स्पष्ट होईल. त्यामुळे या घडामोडीकडे कायदेशीर आणि राजकीय अशा दोन्ही दृष्टिकोनातून पाहणे आवश्यक आहे.

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
मंगळवार, दि. ०४ ऑगस्ट २०२६
३

## थोडक्यात



### लोकशाहीर साहित्यरत्न डॉ. अण्णाभाऊ साठे यांची जयंती विविध सामाजिक उपक्रमांनी उत्साहात साजरी

पाटोदा । प्रतिनिधी

लोकशाहीर साहित्यरत्न डॉ. अण्णाभाऊ साठे यांच्या १०६ व्या जयंतीनिमित्त लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती उत्सव समिती, पाटोदा व साहित्यरत्न प्रतिष्ठान, पाटोदा यांच्या संयुक्त विद्यमाने विविध सामाजिक, सांस्कृतिक व शैक्षणिक कार्यक्रमांचे उत्साहपूर्ण आयोजन करण्यात आले. जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमांची सुरुवात विद्यार्थ्यांसाठी रांगोळी, निबंध, चित्रकला, भाषण आणि संगीत खुर्ची स्पर्धांनी झाली. या स्पर्धांना विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. त्यानंतर सकाळी साठेनगर येथे आष्टी पाटोदा शिरूर मतदार संघाचे युवा नेते जयदत्त भैय्या धस यांच्या हस्ते ध्वजारोहण संपन्न झाले यावेळी न. प पदाधिकारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी समितीचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच सामाजिक व राजकीय क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### मराठवाडा आदर्श शिक्षक पुरस्काराने लक्ष्मण वाघमारे सरांचा गौरव

वडवणी । प्रतिनिधी

आपुलकी व आस्था सेवाभावी संस्था, सेलू (जि. परभणी) यांच्या वतीने सन २०२५-२६ चा मराठवाडा आदर्श शिक्षक पुरस्कार जिल्हा परिषद प्राथमिक.शाळा, ढोरवाडी ता. वडवणी, जि. बीड येथील कर्तव्यदक्ष शिक्षक श्री.लक्ष्मण वाघमारे यांना प्रदान करण्यात आला. हा पुरस्कार शिक्षण क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन मा. गोविंदराव नांदेड साहेब(मा.शिक्षण संचालक,पुणे), श्री.संजय ससाने (शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद परभणी), श्री.शैलेश लाहोटी (उपजिल्हाधिकारी, परभणी), श्री.मिलिंद सावंत (नगराध्यक्ष, सेलू) संयोजक शिवशंकर मोरे सर यांच्या यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. वडवणी तालुक्यातील ढोरवाडी जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे आदर्श शिक्षक व मुख्याध्यापक श्री लक्ष्मण वाघमारे हे गेल्या वीस वर्षापासून शिक्षण क्षेत्रातील समर्पित सेवा, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी केलेले कार्य तसेच लोकसहभाग आणि समाजाभिमुख उपक्रम, विद्यार्थी गुणवत्ता यांची दखल घेत हा प्रतिष्ठेचा पुरस्कार त्यांना देण्यात आला.या यशाबद्दल वडवणी तालुक्यासह बीड जिल्ह्यातील शिक्षक, शिक्षणप्रेमी, विविध सामाजिक संघटना तसेच नागरिकांकडून श्री. लक्ष्मण वाघमारे यांच्यावर अभिनंदनचा आणि शुभेच्छांचा वर्षाव होत आहे. तसेच त्यांना वडवणीचे लोकप्रिय गटशिक्षणाधिकारी मा. राहुलजी भट्टी साहेब, श्री सतीश वाघमारे(संपादक सा. लोकमानस), वडवणी बॉईजचे केंद्रप्रमुख श्री.नितीन डोंगरदिवे, केंद्रीय मुख्याध्यापक श्री बापू धनवे, श्री सुनील मुंडे (चेअरमन) माजी केंद्रप्रमुख श्री. गणेश धायतीडक, श्री लक्ष्मण बहिरवाळ (जिल्हाध्यक्ष), श्री निलेश चव्हाण (तालुकाध्यक्ष) श्री अशोक भिलारे, श्री ज्ञानेश्वर वाव्हाळ, श्री. रामचंद्र मुंडे, श्री.सुरेश मुंडे, श्री सुप्रीम वंजारे, श्री सुरेश वाघमारे, श्री नामदेव प्रभाळे, श्री सचिन डावकर, श्री राजू दास राठोड, श्री कैलास दुधाने, श्री सावन उजगरे यांच्यासह शिक्षक मित्र परिवाराने पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.



## बीड स्थानिक गुन्हे शाखेची धडक कारवाई; मोटार सायकल चोरी करणारा चोरटा जेरबंद, ५ मोटार सायकली जप्त व ४ गुन्हे उघड!

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यात मोटार सायकल चोरीच्या वाढत्या गुन्ह्यांना आळा घालण्यासाठी व गुन्हे उघडकीस आणण्यासाठी पोलीस अधीक्षक श्री. नवनीत काँवत यांनी विशेष मोहीम राबविण्याच्या सूचना दिल्या होत्या. त्या अनुषंगाने स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. शिवाजी बंटेवाड यांनी एक विशेष पथक तयार केले होते.

हे पथक दिनांक ०२.०८.२०२६ रोजी गेवराई उपविभागामध्ये मोटार सायकल चोरी करणाऱ्या गुन्हेगारांचा शोध घेत असताना, स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला गुप्त बातमीदारामार्फत खात्रीशीर माहिती मिळाली की, जातेगाव रोड, गेवराई येथे एक चोरटा चोरीची मोटार सायकल विक्री करण्यासाठी येणार आहे.

या मिळालेल्या माहितीच्या आधारे स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने तात्काळ त्या ठिकाणी सापळा रचून कारवाई केली. पंचांसमक्ष संशयित इसम नामे मच्छिंद्र बबन राठोड (रा. मानसिंगटांडा, ता. गेवराई) यास ताब्यात घेऊन त्याच्याकडे असलेल्या मोटार सायकलच्या कागदपत्राबाबत विचारपूस केली. सुरुवातीला त्याने टाळाटाळ केली, परंतु कसून चौकशी केली असता त्याने सदरची मोटार सायकल चोरीची असल्याचे कबूल केले. त्यानंतर पोलिसांनी त्याच्याकडे अधिक कसून विचारणा केली असता, त्याने आणखी ०४ मोटार सायकली वेगवेगळ्या ठिकाणांहून चोरल्याची कबुली दिली. पोलिसांनी आरोपीकडून एकूण ०५ मोटार सायकली, ज्यांची



एकूण किंमत २,६०,०००/- रुपये आहे, त्या जप्त केल्या आहेत. तसेच सदर मोटार सायकलींच्या अभिलेखाची पडताळणी केली असता खालीलप्रमाणे चार गंभीर गुन्हे उघडकीस आले आहेत:

पोलीस स्टेशन गेवराई - गु.र.नं. ४३९/२०२६, कलम ३०३ (२) भारतीय न्याय संहिता (भान्यासं)

पोलीस स्टेशन चकलांबा - गु.र.नं. २४०/२०२६, कलम ३०३ (२) भारतीय न्याय संहिता (भान्यासं)

पोलीस स्टेशन चिखलठाणा (जि. छत्रपती संभाजीनगर) - गु.र.नं. १५७/२०२५, कलम ३०३ (२) भारतीय न्याय संहिता (भान्यासं)

पोलीस स्टेशन चिखलठाणा (जि. छत्रपती संभाजीनगर) - गु.र.नं. २२०/२०२५, कलम ३०३ (२) भारतीय न्याय संहिता (भान्यासं)

पोलिसांची यशस्वी कामगिरी:

सदरची धडक कारवाई मा. पोलीस अधीक्षक श्री. नवनीत काँवत, अप्पर पोलीस अधीक्षक श्री. समीर शेख, आणि मा. सहा. पोलीस उपअधीक्षक श्री. व्यंकटरमन यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. शिवाजी बंटेवाड, पोलीस उपनिरीक्षक शेखर औटे, तसेच अंमलदार पोह/१६०९ अशोक दुबाले, पोह/१३०२ सोमनाथ गायकवाड, पोह/२०२९ बाळू सानप, पोह/१३३० युनुस बागवान, पोह/४०२ आनंद मस्के आणि चापोअं/२०६२ सिद्धेश्वर मांजरे यांच्या पथकाने अत्यंत वेगाने व यशस्वीरीत्या पार पाडली आहे. ग्रामीण भागात वाहन चोरांवर वचक निर्माण करणाऱ्या या कारवाईचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## आझाद मैदानावरील आंदोलनात दिलेल्या आश्वासनांची तत्काळ पूर्तता करा

बीड । प्रतिनिधी

मुंबई येथील आझाद मैदानावर शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी पार पडलेल्या धरणे आंदोलनादरम्यान दिलेल्या आश्वासनांची तत्काळ पूर्तता करण्यात यावी, या मागणीचे निवेदन शिक्षक समन्वय संघाच्या वतीने खंडेराव जगदाळे सर यांच्या आदेशावरून जितेंद्र डोंगरे आणि आत्माराम वाव्हळ यांनी उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्राताई अजितदादा पवार यांना दिले.

राज्यातील विना अनुदानित अंशतः अनुदानित शाळेच्या वाढीव टप्पा अनुदानासाठी या शाळेत काम करणा-या शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यानी विविध मागण्यांसाठी २२ जून २०२६ पासून आझाद



मैदानावर आंदोलन सुरू केले होते. १० जुलै २०२६ रोजी ग्रामविकास व क्रीडा मंत्री तथा संकटमोचक गिरीष महाजन, शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांनी आंदोलनाला भेट देऊन विविध प्रलंबित प्रश्नांवर सकारात्मक मार्ग काढण्याचे आश्वासन दिले होते.

आझाद मैदानावरील आंदोलनात शासनाकडून दिलेल्या शब्दाची व आश्वासनांची त्वरित अंमलबजावणी व्हावी आणि शिक्षकांच्या प्रलंबित मागण्यांवर मंत्रिमंडळात त्वरित बैठक घेऊन न्याय द्यावा या मागणीचे निवेदन शिक्षक समन्वय संघाच्या वतीने महाराष्ट्र राज्याच्या उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्राताई पवार यांना द्या असे शिक्षकांचे नेते शिक्षक संघर्ष योद्धा खंडेराव जगदाळे सर यांनी आदेशीत केले होते. शिक्षक नेते खंडेराव जगदाळे सरांच्या या

आदेशा नुसार शिक्षक समन्वय संघाच्या वतीने जितेंद्र डोंगरे आणि आत्माराम वाव्हळ यांनी राज्याच्या उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्राताई अजितदादा पवार यांना दिले. यावेळी सुनित्रेताई पवार यांनी यासंदर्भात लवकरच बैठक घेऊन निर्णय घेणार असल्याचे आश्वासन जितेंद्र डोंगरे आणि आत्माराम वाव्हळ यांना दिले. या वेळी त्यांच्या समवेत शिक्षक आमदार विक्रम काळे हे उपस्थित होते. उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार यांनी दिलेल्या आश्वासनामुळे विना अनुदानित आणि अंशतः अनुदानित शाळेचा प्रश्न मार्गी लागेल अशी आशा पल्लवीत झाली असून शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांत आनंदाचे आणि चैतन्याचे वातावरण निर्माण झाले आहे.

## पिंपरखेड येथे लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त लेखन प्रेरणा दिन कार्यक्रम उत्साहात संपन्न

वडवणी । प्रतिनिधी

वडवणी तालुक्यातील पिंपरखेड येथे छत्रपती शाहू महाराज सार्वजनिक वाचनालया मध्ये लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त लेखन प्रेरणा दिन उत्साहात संपन्न झाला या कार्यक्रमानिमित्त प्रमुख पाहुण्या ग्रामपंचायत सदस्य सौ केसरबाई हिरामण खळगे व अंगणवाडी ताई कार्यकर्त्या अग्रीताई अण्णाभाऊ खळगे यांनी पुष्पहार अर्पण करून अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेचे पूजन केले.. यानंतर विद्यार्थ्यांनी आपले अनमोल विचार अण्णाभाऊ साठे यांच्या जीवनावर व्यक्त केले.. या कार्यक्रमाच्या निमित्ताने ग्रंथालयाचे सचिव सन्माननीय प्रकाश तुळशीराम खळगे सर यांनी अण्णाभाऊ साठे यांच्या जीवन कार्यावर आपले मनोगत मांडले.. अण्णाभाऊ साठे यांनी आपल्या जीवनामध्ये प्रतिकूल परिस्थितीवर मात करून,, समाजाला जागृत करण्याचं काम केलेलं आहे ..दीड दिवसात शाळेमध्ये गेलेले अण्णाभाऊ साठे यांनी



आपल्या आयुष्यामध्ये खूप मोठे साहित्य आपल्या बुद्धीच्या जोरावर निर्माण केलेला आहे.. त्यामध्ये ३५ कादंबऱ्या,, पंधरा पोवाडे,, प्रवास वर्णने ,,लोकनाट्य इत्यादी साहित्याची निर्मिती करून समाजामध्ये एक वेगळा ठसा निर्माण करण्याचं काम अण्णाभाऊ साठे यांनी केलेले आहे ..आज अण्णाभाऊ साठे यांचा जन्मदिन ,,लेखन प्रेरणा दिन,, म्हणून संपूर्ण महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यामध्ये आणि प्रत्येक कार्यालयामध्ये साजरा होत आहे.. म्हणून विद्यार्थ्यांनी, वाचकांनी अण्णाभाऊ साठे यांचे साहित्य वाचलं पाहिजे.. त्यांच्या कार्याची ओळख सर्वांना झाली पाहिजे ..त्यांचे विचार सर्वांनी आत्मसात केले पाहिजेत ..अशी भावना खळगे सर यांनी व्यक्त केली.. या कार्यक्रमाच्या निमित्ताने कोणताबाई जाधव ,छायाबाई साळवे ,,सविता खळगे,, अनन्या खळगे,, राजनंदनी खळगे,, सपना खळगे, उदय खरात सर,रोशनी खळगे, नंदनी अडागळे, वैष्णवी गिरी, प्रांजल साळवे, मंगेश शिंदे,सानिका गायकवाड,माया शिंदे,प्रियांका काळे, नंदनी आढागळे,मोहर खळगे,निकिता खळगे,नेहा खळगे,पल्लवी शिंदे, ई. उपस्थित होते..सर्वांना या निम्मित अल्प उपहाराचे वाटप करण्यात आले.आभार व्यक्त करण्यात आले.कार्यक्रमाची सांगता झाली.

**महाराष्ट्र शासन व वनविभाग**
**तहसीलदार, मामलेदार तथा कार्यकारी दंडाधिकारी अंबड**
**(एम.ए.जीविभाग)**

**दुरध्वनी क्रमांक:**०२४८३-२७५०२६ Email id-tahshildarambad@gmail.com

जा.क्र.२०२६/सेतु-कावी/-८६८ दिनांक ०३/०८/२०२६

### जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंखाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार श्रीमान / श्रीमती **रामेश्वर बंडू आरगडे, रा. धनगर पिंपरी ता. अंबड जि. जालना** यांनी यांच्या स्वत: च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
| --- | --- | --- | --- |
| | शिवांश परमेश्वर आरगडे | मुलगा | ०६/११/२०२३ |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक-०३/०८/२०२६ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा कार्यकारी**
**दंडाधिकारी, अंबड**

**महाराष्ट्र शासन व वनविभाग**
**तहसीलदार, मामलेदार तथा कार्यकारी दंडाधिकारी अंबड**
**(एम.ए.जीविभाग)**

**दुरध्वनी क्रमांक:**०२४८३-२७५०२६ Email id-tahshildarambad@gmail.com

जा.क्र.२०२६/सेतु-कावी/-३९२ दिनांक २९/०७/२०२६

### जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंखाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार श्रीमान / श्रीमती **संदीप सुंदर लहामगे, रा. डोमेगाव ता. अंबड जि. जालना** यांनी यांच्या मुलगा च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
| --- | --- | --- | --- |
| | शिवांश संदीप लहामगे | मुलगा | ०२/१२/२०२४ |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक-२९/०७/२०२६ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा कार्यकारी**
**दंडाधिकारी, अंबड**

**महाराष्ट्र शासन व वनविभाग**
**तहसीलदार, मामलेदार तथा कार्यकारी दंडाधिकारी अंबड**
**(एम.ए.जीविभाग)**

**दुरध्वनी क्रमांक:**०२४८३-२७५०२६ Email id-tahshildarambad@gmail.com

जा.क्र.२०२६/सेतु-कावी/-४९० दिनांक १४/०५/२०२६

### जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंखाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार श्रीमान / श्रीमती **हुसनोद्दिन करीमोद्दिन फारूकी, रा. अंबड ता. अंबड जि. जालना** यांनी यांच्या मुली च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
| --- | --- | --- | --- |
| | नाझ बेगम हुसोद्दिन फारूकी | मुलगी | ०६/०८/१९८६ |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक-१४/०५/२०२६ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा कार्यकारी**
**दंडाधिकारी, अंबड**

**महाराष्ट्र शासन व वनविभाग**
**तहसीलदार, मामलेदार तथा कार्यकारी दंडाधिकारी अंबड**
**(एम.ए.जीविभाग)**

**दुरध्वनी क्रमांक:**०२४८३-२७५०२६ Email id-tahshildarambad@gmail.com

जा.क्र.२०२६/सेतु-कावी/-१०१ दिनांक ०३/०८/२०२६

### जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंखाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार श्रीमान / श्रीमती **आबासाहेब देविदास राठोड, रा. रामनगर ता. अंबड जि. जालना** यांनी यांच्या स्वत: च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
| --- | --- | --- | --- |
| | आबासाहेब देविदास राठोड | स्वत: | २०/०७/२००३ |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक-०३/०८/२०२६ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा कार्यकारी**
**दंडाधिकारी, अंबड**

## पान ६ वरुन...

### पिंपळवंडी येथे चिन्नुबाबा

पुष्पहाराने सजवलेल्या काठीची समाज बांधवांनी महिला, पुरुष,युवक-युवती,मुलाबाळांनी मोठ्या संख्येने येऊन डीजेसह फटाक्यांची आतषबाजी करीत भव्य मिरवणूक समाधी स्थळापर्यंत काढून चिन्नुबाबाच्या समाधीचे दर्शन घेऊन गुरू महाराजाला श्रद्धा अर्पण केली.नारळ फोडून पेढ्यांचा प्रसाद व पुष्पहार वाहून समाधी दर्शन घेतले.या मिरवणुकीत समाज बांधवांसमवेत परिसरातील ग्रामस्थ ही मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.या ठिकाणी नारळ,पेढे व पूजेच्या साहित्यांची मोठ्या प्रमाणात दुकाने थाटली होती.त्यामुळे पिंपळवंडी येथे मोठ्या यात्रेचे स्वरूप आले होते.हा उत्सव उत्साहात संपन्न होण्यासाठी गंगाराम फुलमाळी,साहेबा फुलमाळी,सुभाष फुलमाळी,दिलीप फुलमाळी,अशोक फुलमाळी,सूर्यकांत फुलमाळी,राहुल फुलमाळी आदींनी खूप परिश्रम घेतले.शेवटी सर्वांना लापशीचा प्रसाद वाटण्यात आला.या उत्साहाचे विशेष आकर्षण म्हणजे या उत्साहात डोईठाण,पिंपळनेर सह पाथर्डी, जामखेड,करमाळा,सिंदफणा व अन्य ठिकाणाहून सर्व समाज- बांधव कुटुंबांसह मोठ्या संख्येने येऊन सहभागी होतात.

### जय भवानी महाविद्यालयात

नशामुक्तीची सामूहिक शपथ देण्यात आली. यानंतर प्रा. सोमनाथ घाडगे यांनी नशेच्या दुष्परिणामांविषयी, आरोग्य, शिक्षण व समाजावर होणाऱ्या परिणामांबाबत सविस्तर मार्गदर्शन करून युवकांनी व्यसनापासून दूर राहण्याचे आवाहन केले.कार्यक्रमास प्रा. सुनील जाधव, प्रा. कल्पना घाडगे, प्रा. विनोद कीर्तन यांची प्रमुख उपस्थिती होती.या अभियानात महाविद्यालयातील २०० विद्यार्थी तसेच ३८ शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी सहभागी झाले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी प्रा. प्रकाश नाईकवाडे, प्रा. लोखंडे, प्रा. अशोक देवगुडे, प्रा. शिवाजीराव काकडे व प्रा. जाहिद सिद्दीकी यांनी विशेष परिश्रम घेतले.

### अतिक्रमण हटविण्यासाठी

मार्गावरील अतिक्रमणे येत्या दि ०६ ऑगस्ट गुरुवार पासून हटविण्याची मोहीम सुरू करण्याचे निर्देश आ.प्रकाश सोळंके यांनी प्रशासनाला देण्यात आले. अतिक्रमणधारकांना वीजपुरवठ्यासाठी देण्यात आलेले अनधिकृत वीज मीटर एका दिवसाच्या आत काढून घेण्याची कार्यवाही महावितरणने करावी,अशाही सूचनाही आ.सोळंके यांनी दिली तसेच छत्रपती शिवाजी महाराज स्मारकाच्या परिसरातील ट्रान्सफॉर्मर अन्यत्र स्थलांतरित करण्यासाठी महावितरणने तातडीने अंदाजपत्रक तयार करावे.या कामासाठी आवश्यक निधी जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून उपलब्ध करून दिला जाईल.याशिवाय, माजलगाव शहरातील राष्ट्रीय महामार्गावरील दिशादर्शक फलकांवर छत्रपती संभाजीनगर व अहिल्यानगर ही नावे पुढील आठ दिवसांत अद्ययावत करण्याच्या सूचनाही संबंधित विभागांना देण्यात आल्या.दि ०६ ऑगस्ट गुरुवारी सकाळपासून अतिक्रमण हटविण्याची कार्यवाही नियोजनबद्ध व प्रभावीपणे सुरू होईल,यासाठी सर्व संबंधित यंत्रणांनी आवश्यक ती दक्षता घेऊन समन्वयाने कार्य करावे,असे निर्देश आ.प्रकाश सोळंके यांनी बैठकीत प्रशासनाला देण्यात आले.या बैठकीस उपविभागीय अधिकारी गौरव इंगोले, तहसीलदार संतोष रुईकर प्रभारी मुख्याधिकारी धस,उपनगराध्यक्ष सहाल चाऊस यांच्यासह सर्व विभाग प्रमुख उपस्थित होते.

### अण्णाभाऊ साठे यांचे

दिनकर शिंदे,प्रदीप तांबे, संजय वाघमारे, अशोक थोरात यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.पहिल्या दिवशी ब्रह्मगाव येथील लोकशाहीर अण्णाभाऊ साठे स्मारक येथे शिवाजी रांजवण, राम राठोड यांच्या हस्ते ध्वजारोहण व अभिवादन करण्यात आले. त्यानंतर ब्रह्मगाव ते डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौकापर्यंत भव्य दुचाकी रॅली काढण्यात आली. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विशाल कांबळे, करण सरवदे, हनवते,सचिन गायकवाड, जयंती कमिटीचे अध्यक्ष विक्रांत कांबळे,हरी जाधव,उपाध्यक्ष स्वप्निल उमाप, सचिव बालाजी कांबळे,सहसचिव स्वप्निल कांबळे, कोषाध्यक्ष, युवराज कांबळे, संकेत कांबळे, व सर्व अनिल राधे कांबळे मित्रपरिवाराच्या सदस्यांनी पुढाकार घेतला.

### पाटोदा शहरात डेंग्यूचा रुग्ण

दिवसेंदिवस वाढत आहे. आरोग्य विभागाने तात्काळ फवारणी करून प्रतिबंधात्मक उपाययोजना कराव्यात, जेणेकरून डेंग्यूसारख्या आजाराचा प्रादुर्भाव वाढणार नाही, अशी मागणी केली आहे. दरम्यान, आरोग्य विभागाने नागरिकांना ताप, अंगदुखी, डोकेदुखी किंवा इतर संशयास्पद लक्षणे आढळल्यास त्वरित वैद्यकीय सल्ला घ्यावा, घर व परिसरात पाणी साचू देऊ नये आणि डासांपासून बचावासाठी आवश्यक खबरदारी घ्यावी, असे आवाहन केले आहे.

### गर्भलिंग निदान कायद्याविषयी

संपर्क साधणाराचे नाव गुपित ठेवले जाते व तक्रार खरी निघाल्यास व सदरील सेंटर अथवा डॉक्टरांवर कारवाई झाल्यास तक्रार करणारे व्यक्तीला एक लाखाचे पारितोषीक आरोग्य विभागाकडून दिले जाते. त्यामुळे समाजातील नागरिकांनी जागरूक राहून या गोष्टीकडे लक्ष ठेवून आपल्याला काही आढळल्यास तक्रार करावी.

सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री.तत्वशिल कांबळे, विधीदूत यांनी केले. कार्यक्रमाकरिता बीड जिल्हयातील सर्व अधिकार मित्र, जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अधीक्षक श्री.एस.टी.शिंदे व इतर कर्मचारी उपस्थित होते.

# खतांचा काळाबाजार रोखण्यासाठी देशभरात १.६९ लाख धाडी

## महाराष्ट्रात सर्वाधिक कारवाई, लोकसभेत सरकारची माहिती

दिल्ली / वृत्तसंस्था

खतांचा काळाबाजार, साठेबाजी, अनुदानित खतांचा गैरवापर आणि निकृष्ट खतांची विक्री रोखण्यासाठी केंद्र व राज्य सरकारांनी मोठ्या प्रमाणावर कारवाई केल्याचा दावा केंद्र सरकारने केला आहे. देशभरात १ लाख ६९ हजार ३१ धाडी टाकण्यात आल्या आहेत, अशी माहिती लेखी उत्तरात केंद्रीय रसायने व खते राज्यमंत्री अनुप्रिया पटेल यांनी सोमवारी लोकसभेत दिली. खतांच्या काळाबाजारबाबत खासदार रामाशंकर विद्यार्थी राजभर आणि खासदार उत्कर्ष वर्मा मधुर यांनी प्रश्न उपस्थित केला.

राज्यमंत्री पटेल यांनी सांगितले की, ‘‘ १ एप्रिल ते २४ जुलै २०२६ या कालावधीत देशभरात १ लाख ६९ हजार ३१ धाडी टाकण्यात आल्या आहेत या कारवाईत ९ हजार १२७ कारणे दाखवा नोटिसा, २ हजार ८६८ परवाने निलंबित किंवा रद्द करण्यात आले आहेत, तर २७० एफआयआर दाखल करण्यात आले आहेत.‘‘ असे त्यांनी लेखी उत्तरात स्पष्ट केले आहे. प्रत्येक पीक हंगामापूर्वी कृषी व शेतकरी कल्याण विभाग राज्य सरकारांशी चर्चा करून खतांची राज्यनिहाय आणि महिनानिहाय गरज निश्चित करतो. त्यानुसार खतांचे वाटप केले जाते आणि इंटिग्रेटेड फर्टिलायझर मॅनेजमेंट सिस्टीम या ऑनलाइन प्रणालीद्वारे अनुदानित खतांच्या पुरवठ्यावर सतत देखरेख ठेवली जाते. देशांतर्गत उत्पादन अपुरे पडल्यास आयातीद्वारे खतांची उपलब्धता सुनिश्चित केली जाते, अशी माहिती राज्यमंत्री पटेल यांनी दिली. राज्यमंत्री पटेल यांनी दिलेल्या उत्तरात राज्यनिहाय आकडेवारी दिली आहे. राज्यनिहाय आकडेवारीनुसार, महाराष्ट्रात सर्वाधिक ४० हजार ५७४ धाडी टाकण्यात आल्या. त्यानंतर कर्नाटकमध्ये १५ हजार ७०२, पश्चिम बंगालमध्ये १५ हजार ६०१, बिहारमध्ये १५ हजार ७४ आणि तेलंगणामध्ये ११ हजार ६५८ धाडी टाकण्यात आल्या. महाराष्ट्रातील कारवाईत २ हजार १५७ कारणे दाखवा नोटिसा, १ हजार २४३ परवाने निलंबित किंवा रद्द, तसेच ६४ एफआयआर दाखल करण्यात आल्याचे उत्तरात नमूद केले आहे. तसेच उत्तरात दिलेल्या माहितीनुसार, १ एप्रिल २०२१ पासून खतांच्या काळाबाजार, साठेबाजी आणि इतर गैरप्रकारांबाबत सीपी-ग्राम्स पोर्टलवरून देशभरात ६११ तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. त्यापैकी उत्तर प्रदेशातून सर्वाधिक २२७, बिहारमधून ८६, राजस्थानमधून ४१, मध्य प्रदेशातून ३९, तर महाराष्ट्रातून १७ तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. या सर्व तक्रारी संबंधित राज्य सरकारांकडे कारवाईसाठी पाठविण्यात आल्याचे सरकारने स्पष्ट केले. राज्यमंत्री पटेल यांनी पुढे सांगितले की, २०२५-२६ या आर्थिक वर्षातही देशभरात ४ लाख ८४ हजार ६६३ धाडी टाकण्यात आल्या होत्या. त्या कारवाईत १७ हजार ३९२ कारणे दाखवा नोटिसा, ६ हजार ९४१ परवाने निलंबित किंवा रद्द करण्यात आले होते. तसेच ८४७ एफआयआर नोंदविण्यात आले होते.



काळाबाजार रोखण्यासाठी...

खतांचा काळाबाजार आणि गैरवापर रोखण्यासाठी खते अत्यावश्यक वस्तू कायदा, १९५५ आणि खत नियंत्रण आदेश, १९८५ अंतर्गत नियंत्रित करण्यात आल्याची माहिती राज्यमंत्री पटेल यांनी दिली. तसेच अनुदानित खतांची विक्री १०० टक्के आधार प्रमाणीकरणाद्वारे केली जात आहे. बहुतांश राज्यांमध्ये प्रति ग्राहक दरमहा ५० पोत्यांची मर्यादा निश्चित करण्यात आली आहे. याशिवाय काही निवडक जिल्ह्यांमध्ये शेतकऱ्याच्या जमिनीचे क्षेत्र आणि पिकाच्या गरजेनुसार खत विक्री करण्याचा प्रयोगही सुरू असल्याचे त्यांनी लोकसभेत सांगितले.

# हळदीची पाने पिवळी पडण्याची कारणे आणि उपाय


महाराष्ट्रात सध्या अनेक भागांत हळद पीक २ ते ३ महिन्यांच्या वाढीच्या अवस्थेत आहे. या टप्प्यात काही शेतकऱ्यांच्या शेतात हळदीची पाने पिवळी पडण्याची समस्या मोठ्या प्रमाणात दिसून येत आहे. अनेकदा शेतकरी याला एखादा रोग समजून औषधांची फवारणी करतात, परंतु पानांचा पिवळेपणा हा नेहमीच रोगामुळे होत नाही. अन्नद्रव्यांची कमतरता, पाणी साचणे, अयोग्य जमीन, ढगाळ हवामान किंवा कीड-रोग यांसारखी अनेक कारणे यामागे असू शकतात. योग्य कारण ओळखून त्यावर वेळेत उपाय केल्यास उत्पादनातील नुकसान टाळता येते.

हळदीची पाने पिवळी पडण्याची प्रमुख कारणे :

अयोग्य जमिनीची निवड - चुनखडीयुक्त, क्षारयुक्त किंवा चोपण जमिनीत लागवड केल्यास हळदीला आवश्यक अन्नद्रव्ये योग्य प्रमाणात उपलब्ध होत नाहीत. त्यामुळे पिकाची वाढ खुंटते आणि पाने पिवळी पडू लागतात. हळदीसाठी चांगला निचरा होणारी, भुसभुशीत आणि सेंद्रिय कर्बयुक्त जमीन अधिक योग्य ठरते. शेतात पाणी साचणे - सततच्या पावसामुळे शेतात पाणी साचल्यास मुळांना ऑक्सिजनचा पुरवठा कमी होतो. परिणामी मुळे अन्नद्रव्ये शोषू शकत नाहीत आणि पानांचा रंग पिवळा होऊ लागतो. त्यामुळे शेतात पाणी जास्त काळ साचू देऊ नये आणि त्वरित निचऱ्याची व्यवस्था करावी. अन्नद्रव्यांची कमतरता - हळद पिकात नत्र, मॅग्नेशियम आणि लोह यांसारख्या अन्नद्रव्यांची कमतरता असल्यास पानांचा हिरवा रंग कमी होऊन पिवळेपणा दिसतो. विशेषतः नत्राच्या कमतरतेमुळे संपूर्ण झाड फिकट दिसते, तर लोहाच्या कमतरतेत पानांच्या शिरा हिरव्या राहून बाकी भाग पिवळा होतो. ढगाळ हवामान - दीर्घकाळ ढगाळ वातावरण राहिल्यास सूर्यप्रकाश कमी मिळतो. त्यामुळे प्रकाशसंश्लेषणाची प्रक्रिया मंदावते आणि पानांचा पिवळेपणा वाढू शकतो. रोग व किडींचा प्रादुर्भाव - करपा रोग, कंदकुज रोग, कंदमाशी तसेच रसशोषक किडींच्या प्रादुर्भावामुळेही हळदीची पाने पिवळी पडतात. कंदकुज झाल्यास झाडाचा बुंधा काळपट होतो, पाने वाळू लागतात आणि कंद कुजण्यास सुरुवात होते. अशा लक्षणांकडे दुर्लक्ष करू नये.

प्रभावी उपाययोजना : हळदीची पाने पिवळी पडू लागल्यास सर्वप्रथम कारण निश्चित करणे आवश्यक आहे. शेतात पाणी साचत असल्यास त्वरित निचरा करावा. माती परीक्षण करून त्यानुसार खतांचे नियोजन करावे. नत्राची कमतरता असल्यास शिफारशीनुसार युरियाची फवारणी करावी. लोह किंवा सूक्ष्म अन्नद्रव्यांची कमतरता असल्यास फेरस सल्फेट किंवा शिफारस केलेली सूक्ष्म अन्नद्रव्ये वापरावीत. तसेच रोग किंवा किडींची लक्षणे दिसताच कृषी तज्ज्ञांच्या सल्ल्याने योग्य उपाय करावेत.

शेतकऱ्यांसाठी महत्त्वाचा सल्ला : लागवडीपूर्वी माती परीक्षण करा. शेतात पाणी साचू देऊ नका. संतुलित खत व्यवस्थापन करा. नियमितपणे पिकाची पाहणी करा. रोग किंवा किडीची सुरुवातीची लक्षणे दिसताच उपाययोजना करा. कृषी विद्यापीठ किंवा कृषी तज्ज्ञांच्या मार्गदर्शनानुसारच औषधांचा वापर करा.



# तणनाशक फवारणी करताना सोपे उपाय



तणांचे वेळेवर व शास्त्रोक्त पद्धतीने नियंत्रण करणे हे पिकांचे अधिक उत्पादन मिळविण्यासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. प्रतिबंधात्मक उपाय, योग्य मशागतीय पद्धती, आंतरपीक, शिफारशीनुसार तणनाशकांचा योग्य वेळी व योग्य प्रमाणात वापर तसेच एकात्मिक तण व्यवस्थापनाचा अवलंब केल्यास तणांचा प्रभावी बंदोबस्त होऊन उत्पादनात वाढ, उत्पादन खर्चात बचत आणि शाश्वत शेतीला चालना मिळते. शेतातील तणांचा प्रकार (गवतवर्गीय, रुंद पानांची किंवा लव्हाळा) ओळखून त्यानुसार योग्य तणनाशकाची निवड करावी. शिफारशीत मात्रा आणि शिफारशीत पाण्याचे प्रमाण यांचाच वापर करावा. जास्त किंवा कमी मात्रा वापरू नये.

उगवणीपूर्व तणनाशकांची फवारणी पेरणीनंतर १ ते ३ दिवसांच्या आत (४८ ते ७२ तासांच्या), तर उगवणीनंतर तणनाशकांची फवारणी तण २ ते ४ पानांच्या अवस्थेत करावी. फवारणीच्या वेळी मातीमध्ये पुरेसा ओलावा असावा. कोरड्या जमिनीत उगवणीपूर्व तणनाशकांचा परिणाम कमी होतो. तणनाशकांची फवारणी सकाळी किंवा संध्याकाळी केल्यास परिणामकारकता अधिक चांगली मिळते. जोरदार वारा (१० -१५ किमी/तासपेक्षा जास्त) असल्यास फवारणी टाळावी. पावसाची शक्यता असल्यास फवारणी पुढे ढकलावी. अतिउष्ण तापमानात औषधाचे बाष्पीभवन वाढून परिणाम कमी होतो. फवारणीसाठी स्वच्छ व गळतीमुक्त पंप आणि फ्लॅट-फॅन नोजल वापरावी. फवारणीपूर्वी पंपाचे कॅलिब्रेशन करून प्रति हेक्टर योग्य प्रमाणात द्रावण पडत आहे याची खात्री करावी. तणनाशकाचे द्रावण स्वच्छ पाण्यात तयार करावे आणि सतत ढवळत मिसळावे.

शिफारस नसल्यास दोन किंवा अधिक तणनाशके एकत्र मिसळू नयेत. एकाच गटातील तणनाशकांचा सतत वापर टाळावा, अन्यथा तणांमध्ये प्रतिकारशक्ती विकसित होऊ शकते. तणनाशकांचा वापर कोळपणी, आंतरमशागत, आंतरपीक आणि इतर एकात्मिक तण व्यवस्थापन उपायांसोबत करावा. फवारणी करताना औषधाचा उडाव होऊन शेजारच्या पिकांवर जाणार नाही याची काळजी घ्यावी. तणनाशकाच्या लेबलवरील सर्व सूचना (मात्रा, वेळ, सुरक्षितता, प्रथमोपचार, विल्हेवाट) काळजीपूर्वक वाचून त्यांचे पालन करावे. शिफारस केलेल्या पीक, तण आणि अवस्थेसाठीच तणनाशकाचा वापर करावा. तणनाशक फवारणीनंतर जोरदार पाऊस झाल्यास तणनाशकाचा परिणाम कमी होऊ शकतो; आवश्यक असल्यास तज्ज्ञांचा सल्ला घ्यावा. तणनाशकांचा वापर करताना , कृषी विद्यापीठे, कृषी विभाग यांनी शिफारस केलेल्या तणनाशकांनाच प्राधान्य द्यावे.

तणनाशकांपासून सावधानता : फवारणीदरम्यान हातमोजे, मास्क, गॉगल्स, पूर्ण बाह्यांचे कपडे आणि बूट यांसारखी वैयक्तिक संरक्षण साधने वापरावीत. फवारणी करताना धूम्रपान, तंबाखू सेवन किंवा अन्न सेवन करू नये. तणनाशक त्वचेवर किंवा डोळ्यात गेल्यास त्वरित स्वच्छ पाण्याने धुवावे आणि आवश्यक असल्यास वैद्यकीय सल्ला घ्यावा.

फवारणीनंतर हात, पाय आणि चेहरा साबणाने स्वच्छ धुवावा तसेच कपडे बदलून धुवावेत. रिकामे डबे किंवा बाटल्या पुन्हा वापरू नयेत; त्यांची सुरक्षित व शिफारशीनुसार विल्हेवाट लावावी.

फवारणी झाल्यानंतर फवारणी यंत्र स्वच्छ पाण्याने धुवून सुरक्षित ठिकाणी ठेवावे. तणनाशके बंद डब्यात, मुलांच्या व जनावरांच्या आवाक्याबाहेर, थंड व कोरड्या जागेत साठवून ठेवावीत.




### महत्वाच्या घटना

१६६६ : नेदरलँड्स (डच) आणि इंग्लंड देशांत झालेल्या समुद्री युद्धात इंग्रज सैन्यांनी विजय मिळविला.
१८५४ : जपानच्या जहाजातून अधिकृत पणे हिनोमारा ध्वज वापरण्यात सुरवात झाली.
१८७० : युद्धाच्या वेळी आजारी व जखमी सैनिकांना मदत करण्यासाठी लंडन या देशांत ब्रिटीश रेड क्रॉस सोसायटीची स्थापना करण्यात आली.
१८८६ : कोलंबिया देशाच्या राज्यघटनेनुसार कोलंबिया चे नाव बदलून अमेरिका करण्यात आले तेव्हा त्यांनी नवीन संविधान स्वीकारले.
१९१४ : पहिले महायुद्ध  जर्मनीने बेल्जियमवर चढाई केली. प्रत्युत्तरादाखल युनायटेड किंग्डमने जर्मनीविरुद्ध युद्ध पुकारले. अमेरिकेने तटस्थ असल्याचे जाहीर केले.
१९२४ : सोविएत युनियन व मेक्सिकोमधे राजनैतिक संबंध प्रस्थापित झाले.
१९३५ : ब्रिटीश सरकारने गवर्नमेंट ऑफ इंडिया ऐक्टला मंजुरी दिली.
१९४७ : जपानच्या सर्वोच्च न्यायालयाची स्थापना झाली.
१९५६ : भाभा अणुशक्ती केंद्र तुर्भे येथे ’अप्सरा’ ही भारताची सहावी अणुभट्टी कार्यान्वित झाली.
१९६७ : तेलंगाना राज्यातील कृष्ण नदीवर बांधण्यात आलेला जगातील सर्वात लांब दगडी नागार्जुन सागर धरणाचे उद्घाटन करण्यात आलं.
१९८४ : ‘अपर व्होल्टा’ या देशाचे नाव बदलुन ’बुर्किना फासो’ असे करण्यात आले.
१९९३ : राजेन्द्र खंडेलवाल या पुण्याच्या अपंग परंतु जिद्दी साहसवीराने समुद्रसपाटीपासून १८,३८३ फुटांवर असलेली ‘खारदुंग ला‘ ही खिंड आपल्या चार सहकार्यांसह स्कुटरवरुन (कायनेटिक होंडा) पार केली. त्याच्या या कामगिरीची ’गिनेस बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डस’ मधे नोंद झाली.
१९९८ : फिलिपाइन्सच्या माजी अध्यक्षा कोरेझॉन ॲक्विनो यांना आंतरराष्ट्रीय सामंजस्यासाठीचा ’रॅमन मॅगसेसे पुरस्कार’ जाहीर
२००१ : मरणोत्तर त्वचादान करुन दुसर्यांना जीवनदान देणारी, भारतातील पहिली स्किन बँक मुंबई येथील लोकमान्य टिळक रुग्णालयात स्थापन झाली.
२००७ : नासा चे फिनिक्स हे अंतराळ यान प्रक्षेपित कण्यात आले.
२००८ : भारत सरकारने शिपिंग कॉर्पोरेशन ऑफ इंडियाला (एससीआय) नवरत्न दर्जा प्रदान केला.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१५२२ : मेवाड राजघराण्यातील १२ वे शासक व राजस्थान राज्यातील उदयपुर शहराचे संस्थापक तसचं, महाराणा प्रताप यांचे वडिल राणा उदय सिंह यांचा जन्मदिन.
१७३० : सदाशिवराव भाऊ  पानिपतच्या तिसर्या युद्धातील सरसेनापती (मृत्यू: १४ जानेवारी १७६१)
१८२१ : लुई व्हिटोन कंपनीचे निर्माते लुई व्हिटोन यांचा जन्म. (मृत्यू: २७ फेब्रुवारी १८९२)
१८३४ : जॉन वेन  ब्रिटिश गणितज्ञ (मृत्यू: ४ एप्रिल १९२३)
१८४५ : सर फिरोजशहा मेहता  कायदेपंडित, समाजसुधारक व राजकीय नेते, उत्तम प्रशासक व कॉंग्रेसचे एक संस्थापक. १९१३ मधे ’बॉम्बे क्रॉनिकल’ हे इंग्रजी भाषेतील पहिले राष्ट्रीय बाण्याचे वृत्तपत्र त्यांनी मुंबईत सुरू केले. (मृत्यू: ५ नोव्हेंबर १९१५)
१८६३ : महामहोपाध्याय वासुदेवशास्त्री अभ्यंकर  पातंजलीच्या संकृत महाभाष्याचा मराठीत अनुवाद करणारे विद्वान (मृत्यू:)
१८८८ : भारतीय धर्मगुरू ताहेर सैफुद्दीन यांचा जन्म. (मृत्यू: १२ नोव्हेंबर १९६५)
१८९४ : नारायण सीताराम तथा ना. सी. फडके  साहित्यिक व वक्ते (मृत्यू: २२ आक्टोबर १९७८)
१९२९ : आभासकुमार गांगुली तथा किशोर कुमार  पार्श्वगायक, संगीतकार, गीतकार, निर्माता, दिग्दर्शक, आभिनेता व पटकथालेखक, त्यांनी सुमारे ४०० हून अधिक चित्रपटांत गाणी गायिली. ‘चलती का नाम गाडी‘ सारख्या निखळ विनोदी चित्रपटाबरोबरच ’दूर गगन की छाँव में’ सारखे गंभीर चित्रपटही काढले. (मृत्यू: १३ आक्टोबर १९८७)
१९३१ : नरेन ताम्हाणे  यष्टीरक्षक आणि फलंदाज (मृत्यू: १९ मार्च २००२)
१९५० : भारतीय वकील आणि राजकारणी एन. रंगास्वामी यांचा जन्म.
१९६१ : बराक ओबामा  अमेरिकेचे ४४ वे आणि पहिले कृष्णवर्णीय राष्ट्राध्यक्ष, नोबेल पारितोषिक विजेते
१९७८ : भारतीय राजकारणी संदीप नाईक यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

२२१ : चीनी सम्राज्ञी लेडी जेन यांचे निधन. (जन्म: २६ जानेवारी १८३)
१०६० : हेन्री (पहिला)  फ्रान्सचा राजा (जन्म: ४ मे १००८)
१८७५ : हान्स अँडरसन  डॅनिश परिकथालेखक (जन्म: २ एप्रिल १८०५)
१९३७ : डॉ. काशीप्रसाद जायस्वाल  प्राच्यविद्या पंडित व कायदेतज्ज्ञ (जन्म: २७ नोव्हेंबर १८८१)
१९७७ : नोबेल पुरस्कार विजेते इंग्रजी फिजिओलॉजिस्ट एडगर ॲड्रियन यांचे निधन. (जन्म: ३० नोव्हेंबर १८८९)
१९९७ : जीन काल्मेंट  १२२ वर्षे आणि १६४ दिवस जगलेली फ्रेन्च महिला (मृत्यू: २१ फेब्रुवारी १८७५)
२००३ : नोबेल पुरस्कार विजेते अमेरिकन बालरोगतज्ज्ञ फ्रेडरिक चॅपमॅन रॉबिन्स यांचे निधन. (जन्म: २५ ऑगस्ट १९१६)
२००६ : नंदिनी सत्पथी  भारतीय लेखक व राजकारणी (जन्म: ९ जून १९३१)
२०२० : शिवाजीराव पाटील निलंगेकर  महाराष्ट्राचे वे१० मुख्यमंत्री (जन्म: ४ ऑगस्ट १९३१)

# खरीप कांदा पिकाचे वेगवेगळ्या अवस्थेतील नियोजन!



सध्या खरीप कांदा लागवड होऊन एक ते दोन महिन्याचा कालावधी झालेला आहे. पीक वेगवेगळ्या अवस्थेत आहे. यावेळी पिकाला गरजेनुसार पोषक घटकांचा पुरवठा करणे गरजेचे असते. तसेच काही ठिकाणी आंतर मशागतीची कामे, तसेच कीड आणि रोग नियंत्रण करणे गरजेचे आहे. जाणून घेऊ या कांदा पिकाच्या वेगवेगळ्या अवस्थेतील नियोजन.

खरीप कांदा पिकाचे नियोजन : सध्या परतीचा पाऊस झाल्यामुळे करपा प्रादुर्भाव होण्याची शक्यता आहे. हे टाळण्यासाठी लवकरात लवकर शेतातून अतिरिक्त पाण्याचा निचरा करावा. पीक ३० दिवसाचे झाले असल्यास उभ्या पिकात नत्राची पहिली मात्रा २५ किलो/हेक्टर या प्रमाणात द्यावी. लावणीनंतर ४०-६० दिवसांनी पिकात हाताने खुरपणी करावी. कांद्याच्या उभ्या पिकात नत्राची दुसरी मात्रा २५ किलो/हेक्टर लावणीनंतर ४५ दिवसांनी द्यावी. रोपे लावल्यानंतर ४५, ६० आणि ७५ दिवसांनी ५ ग्रॅम/लिटर सूक्ष्म पोषक मिश्रण पानातून फवारणीद्वारे शिफारस केली जाते. नायट्रोजन लीचिंगमुळे शेतात नायट्रोजनची कमतरता होते यामुळे पाने पिवळसर दिसून येत असल्यास, नायट्रोजनची कमतरतेवर भरून काढण्यासाठी युरिया १० ग्रॅम/लिटर पाणी यांची पानांवर फवारणी करावी. सततचा पाऊस, सापेक्ष आर्द्रता (८५% पेक्षा जास्त) आणि ढगाळ स्थिती असल्यास, यामुळे करपा रोगाचा प्रादुर्भाव होऊ शकतो अशावेळी बेनोमिल ०.२% ची प्रतिबंधात्मक फवारणी करावी. बेनोमिल फवारणीनंतर १५ दिवसांनी मॅन्कोझेब २.५ ग्रॅम/लिटर सोबत मेथोमाईल ०.८ ग्रॅम/लिटर सह दुसरी रोगप्रतिबंधक फवारणी करण्याची शिफारस केली जाते.

यामुळे पानांवरील रोग आणि फुलकिडी यांचा प्रादुर्भाव सुद्धा टाळला जातो. फुलकिडी आणि पानांवरील रोग वरील फवारणीद्वारे पूर्णपणे नियंत्रित न झाल्यास, प्रोफोनोफॉस १ मिली/लिटर + हेक्साकोनाझोल १ ग्रॅम/लिटरची दुसरी फवारणी केली जाऊ शकते आणि त्यानंतर फिप्रोनिल १ मिली/लिटर ची फवारणी करावी. गरज भासल्यास प्रोपिकोनाझोल १.० ग्रॅम/लिटर पाणी याप्रमाणे आधीच्या फवारणीनंतर १५ दिवसांनी करावी.







# लोकशाही मार्गाने आंदोलन करणाऱ्यांवर गुन्हे दाखल

## पोलिस प्रशासनाच्या दडपशाहीच्या निषेधार्थ जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने, गुन्हे मागे घेण्याची मागणी

बीड। प्रतिनिधी

बीड जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्रा पवार यांच्या दौऱ्यादरम्यान न्यायाच्या मागण्यांसाठी लोकशाही मार्गाने आंदोलन करणाऱ्या आंदोलकांना परवानगी नाकारण्यात आली. तसेच पालकमंत्र्यांची भेट घडवून आणण्याचे आश्वासन देण्यात आले असतानाही ऐनवेळी भेट न झाल्याने आंदोलनकर्त्यांनी ''न्याय द्या'' अशा घोषणा दिल्या. त्यानंतर आंदोलनकर्त्यांवर गुन्हे दाखल करून अपमानास्पद वागणूक दिल्याच्या आल्याच्या निषेधार्थ सामाजिक कार्यकर्ते तथा बीड जिल्हा माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघाचे मुख्य प्रचार प्रमुख डॉ. गणेश ढवळे (लिंबागणेशकर) यांच्या नेतृत्वाखाली सोमवारी (दि. ३) जिल्हाधिकारी कार्यालयासमोर 'लोकशाही वाचवा', 'संविधान वाचवा', 'आंदोलन आमचा हक्क आहे', 'पोलिस प्रशासनाच्या दडपशाहीचा धिक्कार असो' अशा घोषणांनी निदर्शने करण्यात आली.यानंतर जिल्हाधिकाऱ्यांमार्फत मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस, पालकमंत्री सुनेत्रा पवार, महाराष्ट्र राज्याचे पोलीस महासंचालक आणि विशेष पोलीस महानिरीक्षक, संभाजीनगर परीक्षेत्र यांना निवेदन पाठविण्यात आले.





आंदोलनात माहिती अधिकार कार्यकर्ते शेख युनुस, शेख मुबीन, रामनाथ खोड, बाळासाहेब मोरे पाटील (प्रदेशाध्यक्ष, शिवशक्ती-भीमशक्ती विचारमंच), नितीन सोनवणे ( राज्य प्रवक्ता तथा बीड जिल्हाध्यक्ष ऑल इंडिया पँथर सेना बीड), प्रेम कांबळे( दलित पँथर युवा जिल्हाध्यक्ष बीड),, राजेंद्र आमटे (शेतकरी हक्क आंदोलक), किष्किंधा पांचाळ (जिल्हाध्यक्ष, विश्वकर्मा पांचाळ सुतार समाज, बीड), सिता दहे, सादेक सय्यद (शहराध्यक्ष, आम आदमी पार्टी, बीड), रामधन जमाले (जिल्हाध्यक्ष, इंटक, बीड), सामाजिक कार्यकर्ते हनुमान घोडके, मिलिंद सरपते,भिमराव कुटे, अरूण पांचाळ, समाधान पांचाळ,प्राचार्य डी. जी. तांदळे (मार्गदर्शक, मराठवाडा शिक्षक संघ), ज्येष्ठ समाजसेवक डॉ. संजय तांदळे, नितीन जायभाये (अध्यक्ष, बीड शहर बचाव मंच) , सुर्यकांत ठोकळ, भिंगरेश जोगदंड,राजेश वाघमारे, आनंद डोंगरे,सुंदर वाघमारे, अविनाश वडमारे,शेख अख्तर , सादेक सौदागर,रफिक पठाण, आण्णा डांगे, बबिता शिंदे, सय्यद सादेक, दशरथ थोरात, शारदा थोरात,उमेश गुरू, विनोद कुटे,दिपक शिंदे,प्रविण आनेराव, जालिंदर जगताप, आदी सहभागी झाले होते. डॉ. गणेश ढवळे यांनी सांगितले की, बीड जिल्हा रुग्णालयातील प्रसूतीदरम्यान मृत्यू झालेल्या छाया गणेश पांचाळ यांना न्याय मिळावा, या मागणीसाठी गेल्या वर्षभरापासून विविध आंदोलने व निवेदने देण्यात आली. मात्र न्याय न मिळाल्याने किष्किंधा पांचाळ यांनी पालकमंत्र्यांच्या ताफ्यासमोर ''छाया पांचाळ यांना न्याय द्या'' अशा घोषणा दिल्या. याप्रकरणी पोलीस निरीक्षक शितलकुमार बल्लाळ यांनी आंदोलनकर्त्यांना शिवाजीनगर पोलीस ठाण्यात नेऊन अपमानास्पद वागणूक दिल्याचा तसेच बाळासाहेब मोरे पाटील यांना घोषणाबाजी केली नसतानाही मारहाण केल्याचा आरोप निवेदनातून करण्यात आला आहे. या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करावी तसेच आंदोलनकर्त्यांवरील गुन्हे तातडीने मागे घ्यावेत, अशी मागणी करण्यात आली. डॉ. ढवळे यांनी पुढे सांगितले की, भारतीय राज्यघटनेच्या कलम १९(१)(ब) नुसार नागरिकांना शांततापूर्ण व विनाशस्त्र एकत्र येऊन आंदोलन करण्याचा मूलभूत अधिकार आहे. सर्वोच्च न्यायालयानेही शांततापूर्ण आंदोलन हा लोकशाहीचा अविभाज्य भाग असल्याचे विविध निर्णयांमध्ये स्पष्ट केले आहे. मात्र बीडमध्ये शांततापूर्ण आंदोलनांनाही परवानगी नाकारून आंदोलनकर्त्यांवर गुन्हे दाखल केले जात असल्याने ही लोकशाहीविरोधी भूमिका असल्याचा आरोप त्यांनी केला.

# महान पार्श्वगायक मोहम्मद रफी यांचा 'भारतरत्न' ने गौरव व्हावा-मनोज घुगे





बीड। प्रतिनिधी

महान पार्श्वगायक, स्वर सम्राट पद्मश्री मोहम्मद रफी साहेबांचा आवाज केवळ एक ध्वनी नव्हता, तो एक अनुभव होता,आनंदी भावनांच्या गहनतेचा एक प्रवास होता. त्यांनी आपल्या गायनातून राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश दिला. ते एक महान अष्टपैलू पार्श्वगाय होते. त्यांच्या कारकिर्दीत २६ हजार पेक्षा जास्त गाणी गायल्याचे मानले जाते परंतु संशोधक आणि अभ्यासकानुसार त्यांची नोंद असलेली प्रमाणित ७३४८ गीते त्यांनी हिंदी व्यतिरिक्त मराठी, पंजाबी,बंगाली आणि स्पॅनिश,डच सारख्या अनेक भाषांमध्ये गायलेली आहेत. त्यांना १९६७ साली पद्मश्री पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. त्यांना सहा फिल्मफेअर पुरस्कारासह एक राष्ट्रीय पुरस्काराने देखील सन्मानित केले आहे.

आपल्या आवाजाच्या परिस्पर्शाने त्यांनी अनेक गीते अजरामर केली. त्यांची गीते रसिकांच्या सदैव स्मरणात राहतील. त्यांचा 'भारतरत्न' पुरस्काराने गौरव व्हावा,असे मत मोहम्मद रफी यांच्या गीतांचे एक रसिक चाहते मनोज घुगे यांनी 'एक शाम मोहम्मद रफी साहब के नाम' या कार्यक्रमातील सर्व सहभागी कलाकारांच्या सत्कार समारंभात कलाकारांशी संवाद साधताना व्यक्त केले.प्राचार्य डी.जी. तांदळे, डॉ. संजय तांदळे, बाजीराव ढाकणे आदींनी देखील मोहम्मद रफी साहेबांच्या गीतांच्या आठवणींना उजाळा दिला. एम. एम. शेख, युसुफ पठाण, एस.एम. युसूफ, यांच्या वतीने सालाबाद प्रमाणे याही वर्षी मोहम्मद रफी यांच्या प्रतिदिनानिमित्त दिनांक ३१ जुलै २०२६ शनिवार रोजी बीड शहरातील यशवंतराव नाट्यगृह येथे 'एक शाम मोहम्मद रफी साहब के नाम, या कार्यक्रमात सर्व कलाकारांनी मोहम्मद रफी यांची गाजलेली गीते गाऊन नाट्य गृहातील सर्व रसिकांना मंत्रमुग्ध केले.

नाट्यगृह रसिकांनी खचाखच भरलेले होते. कार्यक्रमातील सहभागी सर्व कलाकारांना दिनांक १ ऑगस्ट २०२६ शनिवार रोजी स्वरांजली संगीत अकॅडमी मध्ये मातृभूमी प्रतिष्ठानच्या वतीने डॉ. संजय तांदळे,ॲड.सुनील ढाकणे, प्राचार्य डी.जी. तांदळे, बाजीराव ढाकणे, मनोज घुगे यांच्या हस्ते शाल, पुष्पगुच्छ व सन्मानपत्र देऊन सत्कार करण्यात आला .सत्कारीत कलाकार पुढीलप्रमाणे एम. एम.शेख,युसुफ पठाण, एस.एम. युसुफ, शेख मजहरोद्दीन,शेख सैलानी, सय्यद मुजीब, आकाश जाधव, अस्मिता सुरवसे, ललिता लांडगे,संध्या जाधव, निशा उजगरे,कृष्णा पांगरे, सय्यद हसीन अख्तर, डॉ. ज्ञानेश्वर जोशी, प्रियंका माने, आशा भारती, अश्विनी गवळी, स्वरांजली संगीत अकॅडमीचे संचालक राहुल गवळी आदी कलाकारांचा सन्मान करण्यात आला. कार्यक्रमास बहुसंख्येने रसिक उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आकाश जाधव यांनी केले तर आभार एम.एम. शेख यांनी मानले.

# पाथर्डी जुने बस स्थानकात नागरी सुविधांचा अभाव?

पाथर्डी । प्रतिनिधी

पाथर्डी तालुक्यातील प्रवाशांच्या अत्यंत जिव्हाळ्याच्या दृष्टीने महत्त्वाचे असणाऱ्या नवीन व जुन्या अशा दोन्ही बस स्थानकात नागरी सुविधांचा अभाव असल्याचे अनेक दिवसांपासून नागरिक व प्रवासी तक्रारी करत आहेत जुन्या बस स्थानकावर सार्वजनिक शौचालय झालीच पाहिजे अशी प्रमुख मागणी अनेक दिवसांपासून होत आहे.

पाथर्डी तालुक्यातील विविध धार्मिक स्थळाच्या दर्शनासाठी येणाऱ्या राज्यभरातील महिला भगिनी व प्रवासी हजारोच्या संख्येने येणाऱ्या शाळकरी विद्यार्थिनी यांची सार्वजनिक स्वच्छतागृह व शौचालय अभावी हेळसांड होत आहे

पाथर्डी परिवहन आगारातील जुने बसस्थानक मोडीत काढून नवीन बसस्थानक निर्माण करणे यासह प्रवाशांच्या सुलभ शौचालय स्वच्छ फिल्टर युक्त पिण्याचे पाणी बस स्थानकात बस थांबण्यासाठी दर्जेदार डांबरीकरण व सपाटीकरण महिला प्रवाशांच्या सुरक्षेच्या दृष्टीने सीसीटीव्ही बसवणे अशा अनेक नागरी सुविधा निर्माण करणे यासाठी कोट्यावधी रुपयांचा निधी मिळाला परंतु सद्यपरिस्थितीत बसस्थानकात नवनिर्मिती व नागरी सुविधा यांचा अभाव असून बस स्थानक निर्मितीतील करोडो रुपयांचा निधी कुठे खर्च केला याची परिवहन मंत्रालय प्रधान सचिव यांच्याकडे लेखी तक्रार देऊन लोकप्रतिनिधी व परिवहन मंडळ प्रशासनाचा भ्रष्टाचाराचा भांडाफोड करणार आहोत.

( किसन आव्हाड )

जुन्या बस स्थानकाची सार्वजनिक शौचालय पाडून सहा ते सात वर्षे झाली आहे तेव्हापासून उघड्या जागेवरती कुठेतरी आडोशाला बसून शाळकरी विद्यार्थिनी महिला व पुरुष यांना लघुशंका करावी लागत आहे वासनंद झालेली व वक्रदृष्टीचे काही लोक लघुशंकेला महिला गेल्यानंतर त्यांच्याकडे असूरी नजरेने पाहत आहेत गेल्या १५ वर्षापासून या मतदारसंघाच्या लोकप्रतिनिधी महिला आमदार आहेत परंतु एसटी आगारातील जुन्या बस स्थानकातील नागरी सुविधांच्या बस स्थानक स्वच्छता सुशोभीकरण व सोयी सुविधा अपूर्ण असल्याने प्रवाशांमध्ये संतापाची लाट उसळली आहे यामुळे पाथर्डी शेवगावच्या लोकप्रतिनिधींनी अक्षम्य दुर्लक्ष केल्याने संताप व्यक्त केला जात आहे .

यामुळे लोकप्रतिनिधी व परिवहन मंडळ प्रशासनाने समदृष्टी ठेवून मतदार संघातील शाळकरी विद्यार्थिनी महिला व प्रवाशांच्या होणाऱ्या सुलभ सौचालयासह नागरी सुविधा तातडीने पूर्ण करण्याची मागणी प्रवासी करत आहेत.

# श्रीमद्भागवत कथा ज्ञानयज्ञाला प्रारंभ

## विशाल महाराज यांचे हरिकीर्तन

मंठा। प्रतिनिधी

मंठा येथील श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर, बोराडे गल्ली येथे वर्ष ४५ व्या श्रीमद्? भागवत कथा ज्ञानयज्ञ सोहळ्याला रविवार, दि. २ ऑगस्ट पासून प्रारंभ झाला असून ८ ऑगस्ट रोजी या सोहळ्याची सांगता होणार आहे. या दरम्यान ७ ऑगस्ट रोजी कीर्तनकार ह.भ.प. विशाल महाराज खोले यांचे हरिकीर्तन होणार आहे.

जगदंबा माता व श्री गणेशाच्या कृपाशीर्वादाने या धार्मिक सोहळ्याची सुरुवात झाली असून दररोज सकाळी ११ ते दुपारी ४ या वेळेत होणाऱ्या कथेत प.पू. वे.शा.सं. श्री मिलिंद महाराज गोंदिकर हे श्रीमद्? भागवत महापुराणावर प्रवचन करणार आहेत, या सोहळ्यानिमित्त शुक्रवार,दि. ७ ऑगस्ट रोजी रात्री ८ ते १० या वेळेत उस्वद रोडवरील गणेश मंगल कार्यालयात ह.भ.प. श्री विशाल महाराज खोले यांचे हरिकीर्तन आयोजित करण्यात आले आहे.नामसंकीर्तन, अभंग आणि हरिभक्तीने हा सोहळा अधिक भक्तिमय होणार आहे. समस्त गावकरी मंडळी, मंठा यांनी परिसरातील सर्व भाविकांना श्रीमद्? भागवत कथा श्रवणाचा तसेच महाप्रसादाचा लाभ घ्यावा असे आवाहन करण्यात आले आहे.

# संपादित जमिनीचा मावेजा न मिळाल्याने खंडपीठ औरंगाबाद यांची संबंधित अधिकाऱ्यांना नोटीस



छत्रपती संभाजीनगर। प्रतिनिधी

मौजे चिखली तालुका आष्टी येथील शेतकरी पप्या फंशा काळे यांची दोन एकर शेती सन २०१२ मध्ये पाझर तलावासाठी संपादित करण्यात आली होती. सदरील जमीन संपादित करताना याचिकाकर्ता यांना कोणताही मावेजा देण्यात आलेला नाही. म्हणून त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना मावेजा मिळणे बाबत लेखी व तोंडी विनंती केली होती. तरीही देखील सन २०१२ पासून कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही. या नाराजीने याचिकाकर्ता पप्या फंशा काळे यांनी ॲडव्होकेट कमालोद्दीन एन फारुकी यांच्यामार्फत माननीय मुंबई उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद येथे रेट याचिका दाखल केली होती. सदरील याचिकेची सुनावणी दिनांक २३.०७.२०२६ रोजी माननीय मुंबई उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद येथील न्यायमूर्ती श्री नितीन बी. सूर्यवंशी आणि माननीय न्यायमूर्ती श्री आबासाहेब डी.शिंदे यांच्या खंडपीठांसमोर झाली असता जिल्हाधिकारी बीड, उपविभागीय अधिकारी, विशेष भूसंपादन विभाग पाटोदा, उपविभागीय जलसंधारण अधिकारी आष्टी, उपअधीक्षक भूमी अभिलेख आष्टी यांना नोटीसा काढण्यात आलेले सदरील याचिकेची पुढील सुनावणी दिनांक २०.०८.२०२६ ठेवण्यात आलेली आहे. याचि कर्ता पप्या फंशा काळे यांच्यावतीने एडवोकेट कमालोद्दीन एन फारुकी यांनी काम पाहिले. तर शासनाच्या वतीने एडवोकेट श्री एस आर वाकडे यांनी काम पाहिले.

# महोत्सव व प्रदर्शनीसाठी व्यापाऱ्यांनी मोठ्या संख्येने यावे-हस्तीमल बंब

## स्टॉलसाठी नोंदणी करा-सतिष पंच

जालना। प्रतिनिधी

व्यापारी महासंघाच्या बैठकीत प्रास्ताविक करताना मराठवाडा विभागीय अध्यक्ष हस्तीमलजी बंब म्हणाले कॅन्फरडेशन ऑफ ऑल इंडिया ट्रेडर्स (कॅट) च्या वतीने प्रथमच राष्ट्रीय स्तरीय व्यापार महोत्सव मुख्य प्रदर्शनीचे आयोजन नवी दिल्ली च्या प्रगती मैदान, भारत मंडपम येथे येत्या १२ ते १५ अगस्त चार दिवसीय भव्य आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती श्री बंब यांनी दिली. पुढे बोलतांना भारतीय व्यापार महोत्सव हा केवळ एक मेळावा, प्रदर्शन नसून देशाचे पंतप्रधान मा. श्री नरेन्द्र मोदी यांनी दिलेल्या 'व्होकल फॉर लोकल', 'लोकल टु ग्लोबल', 'आत्मनिर्भर भारत' या संकल्पनेला देशातील प्रत्येक नागरिका पर्यंत पोहचविण्याचे हे एक राष्ट्रीय अभियान आहे. मराठवाडयातील प्रत्येक जिला अंतर्गत तालुका गांव शाखेचे अध्यक्ष पदाधिकाऱ्यांनी आप आपल्या क्षेत्रातील लहान मोठे उद्योजक सर्व प्रकारचे व्यावसाय करणारे महिला पुरुष, युवा यांच्याशी संपर्क साधावा. प्रत्येक गावात बैठक घेऊन जनजागृती मोहिम, सोशल मिडीया वॉट्सअॅप मेसेज, बैनर पोस्टर, वैयक्तिक भेटी घेऊन हा राष्ट्रीय स्तरीय व्यापार महोत्सव व प्रदर्शनी स्टॉल बदल प्रचार व माहिती देणे गरजेचे आहे.

उत्पादन आपल्या वस्तु आर्थिक साम्रथ्याने दर्शन घडविणारे देशात सर्वात मोठे व्यासपीठ ठरणार आहे. हा भव्य समारोहचे शुभारंभ देशाचे पंतप्रधान मा. श्री नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री श्री अमित शाह, केंद्रीय मंत्री श्री पियष गोयल, माजी केंद्रीय मंत्री स्मृति इराणी, दिल्लीचे मुख्यमंत्री सौ. गुप्ता तसेच कॅट व्यापारी संघटनाचे राष्ट्रीय अध्यक्ष श्री सी. भरतीया, राष्ट्रीय महामंत्री व दिल्ली चांदनीचौक चे खासदार प्रविण खंडेलवाल अनेक राज्याचे अध्यक्ष, धोरण निर्माते, अर्थतज्ञ, उद्योग व्यावसायातील नामवंत मान्यवर सहभागी होणार आहे. प्रथम व्यापार महोत्सव ऐतिहासिक स्वरुपात राहणार आहे.



नुकतेच महाराष्ट्र शासनाच्या उद्योग मंत्रालय तर्फे जालना जिल्ह्यातील श्री बंब यांना प्रथम पुरस्कार देण्यात आले आहे. उत्कृष्ठ कार्याबद्दल आपल्या जिल्ह्याला राज्यस्तरीय पुरस्कार सुध्दा मिळालेला आहे. या सर्व कार्याची पावती म्हणून संपूर्ण मराठवाड्याच्या नेतृत्व जालन्याहुन होत आहे. हे आपल्या जिल्ह्यासाठी अभिमानाची गोष्ट आहे असे बंब म्हणाले. राज्य उपाध्यक्ष सतिष पंच मार्गदर्शन करताना म्हणाले देशभरातून लाखो उद्योजक व्यापारी उपस्थित राहणार आहे. हजारो स्टॉल व प्रदर्शनी लावण्यात येत आहे.

शहरातील ग्रामीण भागातील उद्योग व्यवसाय करणारे लोकांचे उत्पादन वस्तुंना या व्यापार महोत्सवाच्या माध्यमाने राष्ट्रीयस्तर खरीदी विक्रीच्या अवसर मिळेल. या महोत्सवाचे व प्रदर्शनीचे विशेष म्हणजे फक्त स्वदेशी मालाला प्राधन्य मिळेल. जगात देशाला महासत्ता कडे नेण्याचे पंतप्रधानाचे स्वप्न साकार करु स्टॉल व प्रदर्शनी साठी ७ अगस्त पर्यत नोंदणी करावे असे पंच म्हणाले. अंकुश राऊत, अतुल लड्ढा, महिला आघाडीची सौ. सिता मोहिते पाटील यांनी आपले विचार मांडले. या राष्ट्रीय स्तरीय व्यापार महोत्सव व प्रदर्शनी साठी मो. कसीम बावला, जगन्नाथ थोटे, राम मोहिते, सुब्रह्मण्यम अय्यर, प्रमोद जोशी, तुळशीराम गिराम, महिला अध्यक्षा सौ. प्रिया जोशी, सौ. आनंदी अय्यर, सौ. गिराम इ. परिश्रम घेत आहेत. बैठकीत प्रचार सामुग्री वितरण करण्यात आली. तरी मराठवाड्यातील सर्व जिल्ह्यातील ग्रामीण भागातील लहान-मोठे, महिला-पुरुष, उद्योजक व्यापाऱ्यांनी मोठ्या संख्यने उपस्थित राहून लाभ घ्यावा, असे आव्हान हस्तीमलजी बंब यांनी केले आहे. कार्यक्रमाचे सुत्र संचालन सुखदेव बजाज यांनी केले तर आभार प्रविण मोहता यांनी मांडले.

# मंठा ते पैठण बस सेवा सुरु करण्याची प्रवाशांची मागणी





मंठा। प्रतिनिधी

मंठा ते पैठण अशी बस सेवा सुरू करण्याची मागणी मंठा तालुक्यातील प्रवाशांच्या वतीने करण्यात आली आहे. ही बस सेवा मंठा ते परतूर अंबड, पाचोड मार्गे पैठण अशी सुरू केल्यास प्रवाशांना त्याचा फायदा होणार आहे.

अंबड पाचोड, पैठण येथील नागरिकांना प्रवासासाठी सोईस्कर होणार असून या रस्त्यावरून एकही बस मंठा ते पैठण सुरू नसल्यामुळे प्रवाशांना जालना मार्गे किंवा संभाजीनगर पैठण असा दूरचा प्रवास करावा लागत आहे. मंठा अंबड, पैठण अशी बस सेवा सुरू झाल्यास जवळ पास ४० की. मी. अंतर कमी होईल व प्रवाशांचा वेळ पैसा असा दुहेरी फायदा होऊ शकतो. तसेच या दरम्यान येणाऱ्या अनेक गावांमधून श्री क्षेत्र पैठण साठी जाणाऱ्या भाविकांना देखील लाभ मिळेल आणि महामंडळाचे उत्पन्न देखील वाढ होऊ शकते. त्या मुळे परतुर आगाराने मंठा ते पैठण ही बस सेवा अंबड पाचोड मार्गे सुरु करावी अशी मागणी लक्ष्मीकांत लखोटिया, सुभाष महाराज खेत्रे, अमोल कुलकर्णी, पंडित बोराडे, प्रकाश कुलकर्णी, शिवाजी लोखंडे, गजानन शिंदे, अनिल डोंबे, प्रदीप कुलकर्णी, आसाराम खेत्रे, सिद्धार्थ वैद्य, मल्लिकार्जुन संगेवार, सय्यद एजाज, दिनकर वरकड, पवन मुरक्या, बबलू गोंडगे, यांच्यासह अनेक प्रवाशांनी मागणी केली आहे.

cmyk

दैनिक
# राज्य लोकतंत्र

मंगळवार दि.०४ ऑगस्ट २०२६ | ६

# दिंद्रुड येथे २५ हजार झाडे लावण्याचा गावकऱ्यांचा संकल्प
## ग्लोबल विकास ट्रस्टच्या सहकार्याने वृक्षारोपणाला सुरुवात

दिंद्रुड । प्रतिनिधी

पर्यावरण संवर्धन आणि पावसाळी वृक्षारोपणाला चालना देण्यासाठी दिंद्रुड ग्रामस्थांनी एकत्र येत २५ हजार झाडांची रोपे लावण्याचा संकल्प केला आहे. या उपक्रमाला ग्लोबल विकास ट्रस्ट अर्थात जी.व्ही.टी. कडून मोठे सहकार्य लाभले आहे.आज गावकऱ्यांच्या आणि समन्वय समितीच्या उपस्थितीत या वृक्षारोपण मोहिमेचा शुभारंभ करण्यात आला.

या उपक्रमासाठी ग्लोबल विकास ट्रस्टचे मयंक गांधी यांनी दिंद्रुड गावाला विविध जातींची २५ हजार झाडांची रोपे मोफत उपलब्ध करून दिली आहेत. यामध्ये कडुनिंब, करंज, पिंपळ, वड, चिंच, आणि बांबू सारख्या सावली आणि उपयुक्त झाडांचा समावेश आहे. हवामान बदल, वाढते तापमान आणि भूजल पातळी खालावण्यावर उपाय म्हणून वृक्षारोपण अत्यावश्यक आहे. दिंद्रुड ग्रामस्थांनी



दाखवलेली ही एकजूट इतर गावांसाठी प्रेरणादायी आहे. यापुढेही दिंद्रुड च्या सर्वांगीण विकासासाठी आम्ही कायम सोबत असल्याचे प्रतिपादन मयंक गांधी यांनी केले. आज



सरस्वती नदीकाठ आणि सार्वजनिक जागांवर वृक्षारोपणाला सुरुवात झाली. यावेळी गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते पहिले रोप लावून या

> “ या वृक्षारोपणामुळे गावातील तापमान कमी होण्यास, भूजल पातळी वाढण्यास आणि पक्षी-प्राण्यांना अधिवास मिळण्यास मदत होणार आहे. पर्यावरणासाठी हे महत्त्वाचे पाऊल असून जी.व्ही.टी. च्या सहकार्यामुळे हा उपक्रम मोठ्या प्रमाणावर राबविण्यात येत आहे. आमचा उद्देश फक्त रोपे लावणे नाही, तर ती जगवणे आहे.
> – वृक्षारोपण व वृक्षसंवर्धन समिती,दिंद्रुड

मोहिमेचा श्रीगणेशा करण्यात आला. प्रत्येक कुटुंबाने किमान ५ रोपे लावून त्यांच्या संगोपनाची जबाबदारी घ्यावी, असे आवाहन यावेळी करण्यात आले.

# माजलगाव कृषी उत्पन्न बाजार समितीच्या शिरपेचात मानाचा तुरा

### शासकीय कापूस खरेदीत बाजार समिती अव्वलस्थानी तर सीसीआयला सर्वाधिक कापूस दिल्याबद्दल रेखाबाई डरफे यांचा सन्मान

माजलगाव । प्रतिनिधी

माजलगाव कृषी उत्पन्न बाजार समितीने शासकीय कापूस खरेदीमध्ये कापूस विभाग प्रमुख सुनील सवणे यांचे मार्गदर्शनाखाली आणि सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी समन्वय साधत उत्कृष्ट नियोजन, प्रभावी अंमलबजावणी आणि शेतकरीहिताचे कार्य करत संभाजीनगर विभागातून विक्रमी खरेदी केली.याचबरोबर बाजार समितीच्या कार्यक्षेत्रातील महिला शेतकरी सौ.रेखाबाई सुभाष डरफे यांचा छत्रपती संभाजीनगर येथे केंद्रीय वस्त्रोद्योग मंत्री ना. गिरीराज सिंह यांच्या हस्ते शासकीय कापूस निगम लिमिटेड (सि.सि.आय) च्या वर्धापन दिनानिमित्त १ ऑगस्ट रोजी



छत्रपती संभाजीनगर येथील एमआयटी कॉलेजमध्ये आयोजित राज्यस्तरीय कार्यक्रमात राज्यस्तरीय सन्मान झाल्याने माजलगाव कृषी उत्पन्न बाजार समितीच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला गेला आहे.

या कार्यक्रमाला केंद्रीय वस्त्रोद्योग मंत्री गिरीराज सिंह, राज्याचे वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे, पालकमंत्री संजय शिरसाट, मंत्री अतुल सावे, तसेच सीसीआयचे अध्यक्ष ललित कुमार गुप्ता व आयएएस अधिकारी पद्मिनी सिंगला यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमात महाराष्ट्रातील निवडक प्रगतिशील शेतकऱ्यांचा गौरव करण्यात आला. यावेळी रेखाबाई डरफे यांना कापूस वेचणी यंत्र व प्रदूषण नियंत्रण किट प्रदान करण्यात आले. त्यांच्या या यशाबद्दल माजलगाव कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती जयदत्त अण्णा नरवडे, उपसभापती श्रीहरी नाना मोरे, सचिव हरिभाऊ सवणे व संचालक मंडळाने त्यांचे अभिनंदन केले. हा सन्मान माजलगाव तालुक्यासाठी गौरवास्पद असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

# तीर्थक्षेत्र विकास आराखड्यातून साकारलेल्या भव्य भक्त निवासाची धनंजय मुंडेकडून पाहणी

परळी वैद्यनाथ । प्रतिनिधी

परळी वैद्यनाथ येथील श्री वैद्यनाथ ज्योतिर्लिंग तीर्थक्षेत्र विकास आराखड्यातून शहरातील नगर परिषद शेजारी भव्य चार मजली भक्त निवास उभारण्यात आले असुन, येथील कामांची आज माजी मंत्री आ. धनंजय मुंडे यांनी पाहणी केली. सदर भक्तनिवास उभारणीत सुरुवातीच्या टप्प्यात १२ कोटी रुपये खर्च करण्यात आले असून यामधून ८२ खोल्यांसह, स्वयंपाकगृह, भोजनकक्ष इत्यादी कामे पूर्ण झाली असून याठिकाणी ५०० भक्त एकच वेळी राहू शकतील इतकी क्षमता आहे.



सदर ठिकाणी पी ओ पी व फर्निचरचे काम बाकी असून श्रावण महिन्यात भाविकांसाठी हे भक्तनिवास खुले करण्याचा आमचा प्रयत्न असल्याचे धनंजय मुंडे म्हणाले. शहराच्या मध्यवर्ती भागात उभारलेले हे भव्य भक्त निवास वैद्यनाथ दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना नाममात्र शुल्कात उपलब्ध होणार असल्याने बाहेरून येणाऱ्या भाविकांची उत्तम सोय होणार आहे. यावेळी नगराध्यक्षा सौ. पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी, उपनगराध्यक्षा खैसर राजा खान पठाण, बाजीराव धर्माधिकारी, रवींद्र गित्ते, श्रीकृष्ण कराड, सूर्यभान नाना मुंडे, वैजनाथराव सोळंके, अय्युबखान पठाण, निळकंठ चाटे, वैद्यनाथ मंदिर समितीचे सचिव राजेश देशमुख, मुख्याधिकारी श्री. निघळ, कंत्राटदार जाफर खान, शकील कुरेशी, जयपाल लाहोटी यांसह नगर अभियंता, नगरसेवक व पदाधिकारी आदी उपस्थित होते.

# पिंपळवंडी येथे चिन्नुबाबा पुण्यतिथी उत्सव सोहळा उत्साहात संपन्न

पिंपळवंडी । प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यातील पिंपळवंडी येथे तिरमली समाजाचे गुरुमहाराज चिन्नूबाबा फुलमाळी यांचे समाधी स्थळ असून त्यानिमित्त येथे अनेक वर्षांपासून प्रत्येक वर्षी त्यांची या ठिकाणी पुण्यतिथी साजरी केली जाते.यावर्षी हा पुण्यतिथी सोहळा दि.३ ऑगस्ट २०२६ सोमवार रोजी मोठ्या भक्तिमय वातावरणात संपन्न झाला.यानिमित्त दुपारी १२ वाजता बस स्टँड चौकातून मानाच्या ◀◀ पान ३ वर



# जय भवानी महाविद्यालयात नशामुक्त भारत अभियान अंतर्गत जनजागृती कार्यक्रम



पाटोदा । प्रतिनिधी

जय भवानी कला व विज्ञान महाविद्यालय, पाटोदा येथे राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने ‘नशामुक्त भारत अभियान-२०२६’ अंतर्गत जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विश्वास कदम यांच्या हस्ते झाले. यावेळी महाविद्यालयातील विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना ◀◀ पान ३ वर

# अतिक्रमण हटविण्यासाठी तातडीच्या कार्यवाहीचे प्रशासनाला निर्देश - आ.प्रकाश सोळंके

माजलगाव । प्रतिनिधी

स्मारक बचाव संघर्ष समितीने मांडलेल्या विविध मागण्यांचा सकारात्मक व आदरपूर्वक विचार करून त्याबाबत दि ०२ ऑगस्ट सोमवार रोजी संबंधित विभागांची संयुक्त आढावा बैठक घेण्यात आली. बैठकीत सर्व संबंधित विभागांना विहित कालमर्यादेत आवश्यक कार्यवाही पूर्ण करण्याच्या स्पष्ट व कडक सूचना आ.प्रकाश सोळंके यांनी बैठकीत दिल्या

येथील उपविभागीय



अधिकारी कार्यालयात दि ०३ ऑगस्ट सोमवार रोजी ४:०० वाजता घेण्यात आलेल्या बैठकीत प्रशासनाच्या सर्व विभागांच्या बैठकीत माजलगाव शहरातील छत्रपती संभाजी महाराज चौक ते मौलाना आझाद चौक तसेच बायपास ◀◀ पान ३ वर

# पाटोदा शहरात डेंग्यूचा रुग्ण; नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण

### अनेक विविध आजारात वाढ, शासकीयसह खाजगी रुग्णालये फुल्ल

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा शहरात सद्या वातावरणाच्या बदलामुळे पाटोदा व परिसरात ताप,सर्दी,खोकला डेंग्यू, चिकन गोण्या सह विविध आजारात वाढ झाल्याचे दिसून येत असल्याने पाटोद्यात

डेंग्यूचा पहिला रुग्ण आढळल्याने शहरात खळबळ उडाली नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण असून निर्माण झाले आहे. गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या पावसामुळे विविध विविध ठिकाणी पाणी साचल्याने डासांची उत्पत्ती मोठ्या प्रमाणात वाढली आहे. त्यामुळे डेंग्यूसह



इतर साथीच्या आजारांचा धोका वाढण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

शहरातील इलियास सिद्धिकी या युवकाला काही दिवसांपासून तीव्र ताप, अंगदुखी व अशक्तपणाचा त्रास होत होता वैद्यकीय तपासणी व रक्त चाचणीनंतर त्याला डेंग्यूची लागण झाल्याचे स्पष्ट झाले. सध्या त्याच्यावर स्थानिक रुग्णालयात उपचार सुरू असून त्याची प्रकृती स्थिर असल्याची माहिती मिळाली आहे. डेंग्यूचा रुग्ण आढळल्यानंतर परिसरातील नागरिकांनी आरोग्य विभागाने तातडीने प्रतिबंधात्मक उपाययोजना हाती घ्याव्यात, अशी मागणी केली आहे शहरात फॉगिंग, डास प्रतिबंधक औषधांची फवारणी, साचलेल्या पाण्याची विल्हेवाट तसेच जनजागृती मोहीम राबविण्याची आवश्यकता व्यक्त होत आहे. यासंदर्भात सामाजिक कार्यकर्ते शेख इम्रान भाई यांनी, शहरात डासांचे प्रमाण ◀◀ पान ३ वर

# अण्णाभाऊ साठे यांचे साहित्य समाज परिवर्तनाची प्रेरणा देणारे -आ.धनंजय मुंडे

माजलगाव । प्रतिनिधी

लोकशाहीर साहित्यरत्न डॉ. आण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त अनिलराधे मित्र परिवाराच्या वतीने दि ०२ ऑगस्ट रविवार रोजी सांयकाळी आयोजित करण्यात आलेला दहावा सार्वजनिक जन्मोत्सव दोन दिवस विविध सामाजिक, सांस्कृतिक व प्रेरणादायी कार्यक्रमांनी उत्साहात संपन्न झाला. ध्वजारोहण, अभिवादन, भव्य दुचाकी रॅली तसेच सुप्रसिद्ध पार्श्वगायक चंदन कांबळे व शाहीर युवराज ढगे यांच्या बहारदार गीत-सांस्कृतिक

### अनिलराधे कांबळे मित्र परिवाराचा साहित्यरत्न डॉ. आण्णाभाऊ साठे सार्वजनिक जन्मोत्सव उत्साहात




कार्यक्रमाला नागरिकांनी मोठी उपस्थिती लावली.

कार्यक्रमाचे उद्घाटन माजी मंत्री आ.धनंजय मुंडे यांच्या हस्ते झाले,यावेळी बोलताना आ. धनंजय मुंडे म्हणाले, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांनी आपल्या साहित्य,शाहिरी आणि विचारांच्या माध्यमातून वंचित,श्रमिक आणि सर्वसामान्य समाजाला न्याय व स्वाभिमानाची प्रेरणा दिली. यावेळी आयोजक अनिलराधे कांबळे,दीपक थोरात,भीमराव नाडे,विनोद शिंदे, भास्कर शिंदे, कचरू कांबळे, रघुनाथ कसबे, बंडू लोखंडे, रूपाली कचरे, विनायक रत्नपारखी,मोहन जाधव,मुजमेल पटेल, विष्णू आगे,ज्ञानेश्वर सरोदे,बाळू ताटक,एकनाथ मस्के,दिलीप झगडे, ◀◀ पान ३ वर

# गर्भलिंग निदान कायदयाविषयी जनजागृती शिबीर संपन्न

बीड । प्रतिनिधी

दिनांक ३ ऑगस्ट २०२६ रोजी जिल्हा विधी सेवा प्राधिकरण कार्यालय, बीड येथे मा.श्री.दिनेश पी.सुराणा, अध्यक्ष, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, बीड यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यातील सर्व अधिकार मित्र यांच्यासाठी गर्भलिंगनिदान या विषयावर जिल्हास्तरीय प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ.वहाब ए.सय्यद, सचिव जिल्हा विधी सेवा प्राधिकरण व प्रमुख मार्गदर्शक म्हणून डॉ.संतोष शहाणे, स्त्री रोगतज्ञ, जिल्हा शासकीय रूग्णालय, बीड,



श्रीमती रमा गिरी, अधिसेविका, जिल्हा शासकीय रूग्णालय, बीड, अॅड.एन.बी.जोशी, लिगल अॅडव्हायजर पीसीपीएनडीटी अॅक्ट हे उपस्थित होते. यावेळी मार्गदर्शन करताना डॉ.संतोष शहाणे यांनी गर्भातील बाळाचे लिंग जाणून घेणे आणि गर्भपात करणे हा कायदयाने गुन्हा आहे. पी.सी.पी.एन.डीटी कायदयाने सोनोग्राफी केंद्राची नोंदणी, डॉक्टरांची नोंदणी व जागेची नोंदणी सक्तीचे आहे. पी.सी.पी.एन.डीटी. अॅक्ट हा १९९४ साली संसदेमध्ये संमत करण्यात आला. नियमभंग करणा-या डॉक्टरांनी आणि सोनोग्राफी केंद्रावर कार्यवाही झाल्यास यामध्ये ३ ते ५ वर्षाचा कारावास आणि १० ते ५० हजार रूपये दंडाची तरतूद आहे.


अध्यक्षीय भाषणात डॉ.वहाब सय्यद, सचिव जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, बीड हे बोलताना म्हणाले की, मुलींचे प्रमाण वाढवण्यासाठी समाजाची मानसिकता बदलणे गरजेचे आहे. मुलगा मुलगी एकसमान हा संदेश गावागावात जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या माध्यमातून राबवला जात आहे.

रमा गिरी या बोलताना म्हणाल्या की, जिल्हा रूग्णालयामध्ये काम करत असताना पालकांचे आपुलकीने चर्चा करून त्यांना न समजणा-या गोष्टी समजावून सांगून त्यांचे समुपदेशन करून मुलगा मुलगी एक समान आहेत. गर्भलिंग निदान केल्यास कायदयाने आपल्यावर गुन्हा दाखल होवू शकतो. या करिता प्रत्येक येणा-या गरजू महिला व त्यांच्या नातेवाईकांशी समुपदेशन करून त्यांची समस्या सोडवण्यास आम्ही मदत करतोत. अॅड.निलेश जोशी यांनी आपल्या भाषणात सांगितले की, बीड जिल्हयामध्ये पी.सी.पी.एन.डी.टी. अॅक्ट प्रभावीपणे राबवण्यासाठी जिल्हा शल्यचिकित्सक बीड यांचे अध्यक्षतेखाली जिल्हा स्तरीय समिती स्थापन केली असून जिल्हाभरामध्ये तक्रार आल्यास सोनोग्राफी सेंटर व इतर सेंटरची तपासणी केली जाते. जिल्हयात कोणत्याही व्यक्तीला गर्भलिंग निदान होत आहे असे समजल्यास १०४ या टो फ्री क्रमांकावर संपर्क साधावा. ◀◀ पान ३ वर

# जातीवाचक शिवीगाळ केल्याच्या आरोपातून बाहेगव्हाण येथील अनुरथ मस्के व इतरांची सबळ पुराव्याअभावी निर्दोष मुक्तता

माजलगाव । प्रतिनिधी

फिर्यादी यास आरोपीने दि २४ ऑगस्ट २०२० रोजी जातीवाचक शिवीगाळ करून, लाकडी दांड्याने मारहाण करून, जिवे मारण्याच्या धमक्या दिल्या म्हणून फिर्यादीने वडवणी पोलीस स्टेशन येथे दिनांक दि २५ ऑगस्ट २०२० रोजी आरोपींच्या विरुद्ध फिर्याद दाखल केली त्यानंतर वडवणी पोलीस स्टेशन यांनी गु.र.नं. १९१/२०२० कलम १४३,१४७,१४८,१४९,४५२,४२७,३२३,५०४,५०६ भादवी व (३), (१), (आर), (एस) आणि ३(२)(व्हि.ए.) अ.जा. ज.अ.प्र.का.गुन्हा दाखल केला सदर प्रकरणाचा तपास उपविभागीय पोलीस अधिकारी, माजलगाव, यांच्याकडे दिल्यानंतर त्यांनी सदर प्रकरणांचा तपास पूर्ण करून आरोपी विरुद्ध अतिरिक्त सत्र न्यायालय माजलगाव यांचे न्यायालयात आरोपीं विरुद्ध दोषारोपपत्र दाखल केल्यानंतर



सदर प्रकरणात सरकार पक्षाच्या वतीने एकूण ८ साक्षीदार तपासण्यात आले त्यानंतर सरकार पक्षाच्यावतीने व आरोपीच्या वतीने अतिरिक्त सत्र न्यायाधीश माजलगाव यांच्या न्यायालयात अंतिम युक्तिवाद केल्यानंतर माजलगाव येथील अतिरिक्त सत्र न्यायाधीश डॉ. उमेशचंद्र जे.मोरे यांनी आरोपी यांची सबळ पुराव्या अभावी निर्दोष मुक्तता केली.आरोपींच्या वतीने ड. व्ही.बी. लवटे,ड.एल. बी.गवते यांनी प्रभावीपणे बाजू मांडली व त्यांना ड.एस.डी.लंगे, ड.व्ही.एन. जुजगर,अँड.सी. आर.गवते यांनी सहकार्य केले.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

cmyk